
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. २११८
स.क्र. १९२८

ॐ

सं.काव्य.८१५



REFBK-0003166

# श्री. 'नूपुर'

ॐ

# श्री. ' नूपुर '

कवि.


**विनायक गोविंद साठये.**



प्रकाशक.

**पांडुरंग श्रीपाद जोशी**

**प्रमुख, स्नेह-संवर्धक-संघ, मिरज.**

मुद्रक

**धोंडो राजाराम ठाकूर**

" तरुण भारत " प्रेस, बेळगांव.

मिरज, शके १८४८.

**किंमत बारा आणे.**



REFBK-0003166

# समर्पण !

सत्काव्याऽभरणें मनोहर कितीं अर्पून अद्याऽवधि ।
वेळोवेळ जुन्यानव्या कविवरीं त्वत्कंबु–कंठामधीं ।
नाहीं गे तिलमात्र ही स्थल रितें वाग्देवते ! ठेविलें ।
शोभा निस्तुल ती खरीच; दिपले मन्नेत्र खालावले !

खालावे मम दृष्टि थेट भिडली तों पादपद्मद्वयीं ।
तों तें स्थान रितें बघून भरलें मच्चित्त हर्षोऽच्चयीं ।
भावें सत्वर साधलें मज तसें नूपुर मी निर्मिलें ।
मातेला प्रिय बालचेष्टित तसें हें हो तुला वत्सले !

**विनायक गोविंद साठये, मिरज.**

# हृद्गत.

“ तुला वाहिला रानफुलांचा साधा भोळा साज
तरी गोड हा काय न करशिल दीनदयाळे आज ! ”

**वाचकहो :—**

कुठें रसिकहृदय–विलासिनी श्री वाग्देवता आणि कुठें तिच्या दारीं धूलपाटीवर ‘ श्री श्री ’ करणारा नेणता बोबडा बाळ मी ! उभ्या जगाला घटकेंत भुलवणारी तिच्या पावलांची ती सहजसुंदरता कुठें आणि माझ्यासारख्या नवशिक्यानें घडलेल्या या चार ओबड धोबड घागऱ्यांची ही दावण कुठें ! हा असा अगदीं साधाभोळा साज घातल्यानें तिच्या मुळांतच अत्यंत सुंदर असणाऱ्या पावलांना शोभा ती काय येणार ? “ वृथा शीण आहे ” घालण्याचा हें उघड असल्यानें हें नूपुर तयार होऊन कित्येक दिवस झाले तरी तें रसिकजनतारूप शारदेपायीं उघडपणें घालण्याचा मला मुळीं धीरच होईना.

अखेरीस श्रीशारदेनेंच प्रेरणा केली कीं काय न कळे आमचा स्नेहसंवर्धक संघ मिरज–ह्मणजे मूर्तिमंत आपलेपणाच जणु–त्यास हें काम सर्वतोपरि पत्करण्याची बुद्धि झाली व त्यानें हें नूपुर माझ्या ‘ होना ’ ची मुळींच परवा न करितां माझ्याकडून जसें हिसकूनच घेतलें; इतकेंच नव्हे तर त्याचे पुढले सारे संस्कार आपली पदरमोड करूनही केले व आजच्या या मोहक स्वरूपांत तें जनताशारदेस अर्पणही केलें ! आतां हें नूपुर जनतेला साजून दिसो वा कसेंहि दिसो त्याची सारी जबाबदारी सदर संघानें आपल्या माथीं घेऊन मला सर्वस्वी एका अर्थी मोकळा तर दुसऱ्या अर्थी उपकाराच्या लोहदंडानें ह्मणा वा पुष्पदामानें ह्मणा जखडून टाकला आहे ! नवल इतकेंच कीं, ह्मटली तर जबर नाहीं तर नाजुक अशा या खोडाबेडींत रहाण्यांतच मला मोकळा राहण्याहून अधिक आनंद आहे !

शेवटीं जिच्या प्रेमळ पंखाखालीं वेळींच आसरा लाभल्यानें माझा बाळपणींचा दुबळेपणा जाऊन आज पोटापुरत्या बळासह गुशीलाची जोड

झाली त्या मातृवत् " श्रीअंबाबाई तालीम संस्था मिरज " -इच्या कां या नूपुराचें सर्व खर्चवेंच वजा जातां राहणारें सारें उत्पंन्न लावण्यासाठीचें सदर संघानें हा भार आपल्या माथीं घेऊन मला आपल्याबरोबरच मातृ-ऋणांतून अंशतःतरी या द्वारें मुक्त होण्याची ही सुवर्णसंधि आणून दिल्याबद्दल सदर संघाचें साभिनंदन आभार मानून तसेंच संघाच्या स्तुत्य हेतूचें महत्व जाणून त्याला योग्य तें आर्थिक साहाय्य देण्याच्या बुद्धीनें जे या पुस्तकाला उदार आश्रय देतील त्या रसिकवाचकांचे गौरवपूर्वक आभार मानून माझें हें अल्पसें हृद्गत मी पुरें करितों.

वर्ष प्रतिपदा शके १८४८
खंडाळा बावडा (सातारा)

सर्व रसिकांचा कृपाभिलाषी
नम्र,
**विनायक गोविंद साठये.**

# पुरस्कार.

प्रस्तुत काव्याचे कर्ते आमचे विनायकराव यानां लहानपणापासूनच कविता देवीनें आपल्या भक्त मंडळींत दाखल केलें आहे. कै० गु० वासुदेवशास्त्री खरे यांच्या प्रोत्साहनरूपी दीक्षेनें त्यानीं आपल्या कवनास सुरवात केली. काव्यरत्नावली आणि "तरुण भारत" या मासिकांच्या वाचकांनां त्यांच्या कवितेचा परिचय आहेच. कवीची याहून अधिक ओळख करून देणें कदाचित् औचित्यास धरून होणार नाहीं. याच कविच्या 'वीर-रसायन अर्थात् सिंहगडचा पोवाडा' या काव्याच्या प्रस्तावनेंत रा० ब० आगाशे यानीं विनायकरावांचा गौरव केला आहेच. आह्मी कितीही झालें तरी वधूबंधू, आह्मी या कवितेची तारीफ कशी करावी? प्रस्तावनेचे अलंकार न घालतां विनायकरावांच्या काव्यकन्यकेस स्वतःच्या नैसर्गिक माधुर्यानेंच शोभण्यास अवकाश द्यावा असें या खेपेस आह्मी ठरविलें आहे. आमच्या आवडीप्रमाणें जर सवड असती तर या पूर्वींच हा संग्रह महाराष्ट्र वाचकांच्या हातीं पडला असता. श्री शारदेच्या विशाल दरबारांत गर्दी अशी कधीं नसतेच. लहान थोर सर्वांनाच तेथें स्थान आहे.

पुस्तक प्रकाशनाचें कामीं सुप्रसिद्ध कवि श्री. किरात यांचें आपलेपणाचे सहाय्य मिळणें हें कवि आणि प्रकाशक या दोघांचें सद्भाग्य होय. त्यांचे आभार मानून आह्मी त्यानां दुखवीत नाहीं. श्रीयुत विष्णु माधव गोखले यानीं 'नूपुरा' च्या प्रकाशन-खर्चाकरितां पन्नास रुपयांची आर्थिक मदत केली व त्यामुळेंच सदर "नूपुर" चा आवाज जनतेच्या कानीं अधिक लवकर पडूं शकला. त्याबद्दल कवि व प्रकाशक यांच्या प्रमाणेंच वाचकांनींही श्री. गोखले यांचे आभार मानणें आवश्यक आहे.

श्री हनुमज्जयन्ति
शके १८४८.

प्रकाशक.

# अनुक्रमणिका.


| | | | पान. |
|---|---|---|---|
| १ | ऊठ आतां तरी. | .... | १ |
| २ | तो नाहीं वसणार सुंदर अशा. | ... | २ |
| ३ | गुप्ती. | .... | ३ |
| ४ | वियोगिनी | .... | ६ |
| ५ | आहेर. | .... | १० |
| ६ | मंगलाक्षता. | .... | १२ |
| ७ | आमंत्रण. | .... | १३ |
| ८ | इंद्रधनुष्य. | ... | १४ |
| ९ | तेजस्विता. | .... | १६ |
| १० | निशाणवाला. | .... | १६ |
| ११ | पिंडीवरचे विंचू. | .... | १८ |
| १२ | जन्मरहस्य. | .... | १९ |
| १३ | कन्यादान. | .... | २० |
| १४ | तूं कोण? | ... | २१ |
| १५ | मोहनमाळ. | ... | २३ |
| १६ | त्वरित मावळलेंस कसें फुला? | .... | २४ |
| १७ | सलगीचा सवाल! | ... | २६ |
| १८ | घटमहिमा. | ... | २९ |
| १९ | तिलांजलि! | .... | ३१ |
| २० | आजचा दसरा. | .... | ३२ |

| | | |
|---|---|---|
| २१ खरें पाणी. | ... | ३४ |
| २२ कां ह्मणून आह्मी गुलाम? | .... | ३५ |
| २३ बोला फुलाशीं गांठ! | .... | ३९ |
| २४ ताईची गंमत! | ... | ४० |
| २५ ये सोने इकडे. | ... | ४१ |
| २६ घे घे नांव! | ... | ४२ |
| २७ तथास्तु! | .... | ४२ |
| २८ सासुरवास. | ... | ४३ |
| २९ सासुरवास ( २ रें दृश्य ) | ... | ४४ |
| ३० सिंहगड चढून गेल्यावर! | .... | ४५ |
| ३१ गेला कालचि राम! | .... | ४६ |
| ३२ निराशा. | .... | ४७ |
| ३३ माझी हांव. | .... | ४८ |
| ३४ प्रियास्मारक. | .... | ४९ |
| ३५ योगायोग. | ... | ५२ |
| ३६ सख्याची भेट! | .... | ५३ |
| ३७ मंगलाक्षतांचे दोनच दाणे | .... | ५६ |
| ३८ शारदश्री! | .... | ५७ |
| ३९ सांत्वन! | .... | ५८ |
| ४० गोरा कुंभार. | ... | ५९ |
| ४१ सांगा कां भरतां तशी | .... | ६१ |
| ४२ शोक लहरी. | .... | ६२ |
| ४३ आत्मार्पण. | ... | ६६ |

| | | |
|---|---|---|
| ४४ तारुण्याचें ध्येय. | .... | ६७ |
| ४५ भिकारीण. | .... | ६९ |
| ४६ आशाभंग. | .... | ६९ |
| ४७ गंगावतरण. | .... | ७२ |
| ४८ अभिनंदन. | .... | ७७ |
| ४९ आत्मवंचित. | .... | ७७ |
| ५० गेले चित्तरंजन दास! | ... | ८५ |
| ५१ प्रभुप्रार्थना. | ... | ८६ |

# नूपुर.

काव्य
३७६६

## १ ऊठ आतां तरी—

[ एका सुप्रभातीं जागा झालों तों समोर भिंतीवर लाविलेलें श्रीशेषशायी नारायणाचें छायाचित्र दृष्टीस पडून जे विचार सुचले ते या खालीं ग्रथित केले आहेत. ]

### भूपाळी.

चालः—होय संसार तरु मुग्ध०

ऊठ आतां तरी शेषशयना हरे!
  दीन दारीं उभीं आळविति लेंकरें ! ॥ ध्रु० ॥
सोड * आई! चरण । सुचिर चुरिले निपुण
  पार गेलाचि शिण । प्रभुसि नव बल भरें ॥ १ ॥
दूर कर फणिवरा[1]! । तव फणा—परिकरा[2]
  कीं विषें निजखुरा । देव केला खरें! ॥ २ ॥
उतर कमलासना[3]! देव भारावला
  नाभि—कमलीं तुला । वाहि कितिकाल रे! ॥ ३ ॥
हस्तकमलीं कमल । गंध मोहक विपुल ।
  दूर तें कांहिं पल । राहु द्यावें बरें! ॥ ४ ॥
तुज रमेविण कधीं । जरिहि पळ: नच सरे
  विरह अजि सोस रे । राखण्या लेंकरें! ॥ ५ ॥

---

* आई=लक्ष्मी. १ शेष. २ फडांचा विस्तार. ३ ब्रह्मदेव.

चक्र गरगर फिरवि । त्यासि दे गति नवी
झोंप ना एरवीं । तुजसि सोडिल पुरें! ॥ ६ ॥
एकदा दरं[१]–वलय । घुमवि चैतन्यमय
सदसंदीं[२] अभयभय । झणिं शिरो समभरें ॥ ७ ॥
चंड कौमोदकी । घे गदा हस्तकीं ।
दुष्टजन–मस्तकीं । योज तिज बळभरें ॥ ८ ॥
उग्र उज्वल निशितँ[३] । खड्ग नंदक विदित
ऊठ रे खेळवित । अतुल कुशलें करें ॥ ९ ॥
सज्ज यापरि पुरा । होचि नत–हित–करा
विषम–भारतधरा—भार हर सत्वरें ॥ १० ॥
बहुविधाऽन्याय–हत । धर्म झाला विकृत
पाप उन्नति वरित । दंडय संतचि ठरे ! ॥ ११ ॥
सुजन निर्दोषही । अमित कारा–निहित
भोगिती दुःखशत । काय सांगूं अरे ! ॥ १२ ॥
निर्दयाची सुरी । गोकुला किति चिरी
घेशि तरि सुरसुरी । हाय! गोपाल रे ! ॥ १३ ॥

---

## २ तो नाहीं वसणार सुंदर अशा गारेंत कां श्रीपति ?

[ नेणत्या बाळास दगडमातींतही दिसणारा देव जाणत्या (?) माणसांनाच कां दिसत नाहीं कोण जाणे ! ]

" बाळा ! काय बरें तुला गवसलें वाळूमधें त्या स्थळीं ?
जाशी धांवत घेउं जें दुडदुडा या कोंवळ्या पावलीं !

---

१ शंख. २ भलेबुरे. ३ धार लावलेलें.

पायीं कांहिं रुतेल हें भय तुला वाटे न केव्हां कसें ?
कोठें कांहिं तुला विशेष दिसतां त्याचेंचि लागे पिसें !
पाहूं दे तरि काय तें दडविलें हातीं तुवां राजसा ? ”
“ हो—नाहीं ” करितां मुठीस उघडी तो शेवटीं अल्पशा
तों त्या बाप वदे “ खुळ्या ! दगड हा ! त्याचें तुला एवढें—
वाटे काय ? खिशांत घाल नच तो फेंकून आतांच दे ! ”
“ ऊंहूं ” ! तोंच वदून बाळ रुसला, सोडून बापा बसे.
ऐकूं ये सहजीं दुज्या पुटपुटूं लागे स्वतांशीं असें:—
“ देव्हाऱ्यांत घरीं किती तरि असे आहेत, ते तेवढे—
यांचे देव ह्मणे; न देव पण हा,—आश्चर्य हें केवढें !
साऱ्याही जगतांत देव भरुनी राहे असें सांगती
तो नाहीं वसणार सुंदर अशा गारेंत कां श्रीपति ? ” !

---

## ३ गुर्मी.

[ ‘ अहंब्रह्मास्मि ’ ही जाणीव झालेला मुमुक्षु जीवात्मा त्याला स्ववश करूं पाहणाऱ्या षड्विकारांना कसे तुच्छ करितो याचें कल्पनिक चित्र काढण्याचा यांत प्रयत्न केला आहे. ]

चाल-पदाची.

चाल कशाला करिता मजवर ? । आज न मी हो, जसा आजवर
कुणीहि दंडो दुबळा पामर !
मर्दांहि ज्यावर । करित निरंतर । सत्ता होतीं शिरजोर ! ॥ १ ॥
‘ अरे हा ’ !—पुढें कशास येतां ? । याच पावलीं इथून परता !
फुकट कां जिवीं उदार होतां ?
पुरेत गमजा । नव्हे ही मजा । हंसतां पण मग रडणार ! ॥ २ ॥

मला हंसाया ओठ फांकले । बत्तिस भाले तों लखलखले !
मधें विषारी कट्यार खेळे
खेळा उधळिन । भाले मोडिन । ओठ—दूध मी पिळणार ! ॥ ३ ॥

काळ्या फौजा ठेवा तोंडीं । लावा माझ्या कीं बोकांडी
करोत त्या जी जमे तांतडी ।
त्यांना गणतो । इथें कोण तो ? । सजला हा जर झुंजार ! ॥ ४ ॥

त्या ओठाच्या कोटीं तुमचें । गोरें बळकट बळ दांतांचें ।
नाचे नाचो उत्सुक साचें !
त्या सान्यांशीं । लढूं पुरेशी । हिंमत एका मज जबर ! ॥ ५ ॥

तुह्मी सहा जण एक जुटीनें । करा चढाई पुऱ्या शिस्तिनें
दाहि दिशांचीं धरून वदनें
क्षणांत साचा । पण मी तुमचा । कोट फोडितों अनावर ॥ ६ ॥

एकचि फटकाऱ्याचें काम । ह्मणाल एका पळांत राम ।
काळचि तुमचा मी न गुलाम !
मिटून डोळा । नुघडे सगळा । तोंच तुह्मा हें पटणार ॥ ७ ॥

उदंड वेंचा मायाजाल । जादू टोणा करा खुशाल !
उघड अशानें मात्र शिणाल
आपआपली । ओळख पटली । कोण कुणाला बघणार ? ॥ ८ ॥

मला फसविण्या धरून हांव । टाका डावामागें डाव ।
मजवर घाला किंवा देव !
मुठीहि मारा ! उडीद पेरा ! तरि बेडर मी हंसणार ! ॥ ९ ॥

किती चेतला, किती खेळला । पाऊस काळीं सरड माजला
तरि कां सांगा भुजंग झाला ?
न सोडि कुंपण । तुमचीही पण । तीच गोष्ट मज महशूर ! ॥ १० ॥

चपल धांवतां भुजंगराणा । ताठ उभारो आपली फणा
काळविषाला वमो फणफणा !
अवचित त्या पण । करून झडपण । धीट घार वर नेणार ! ॥११॥
चपळाइमधें त्याहि घारिला । छे छे पळल्या घन–चपलेला
शके सहज जी लाजविण्याला ।
अशी अलौकिक । किर्ती अमोलिक । कोण तळपते पहा तर ! ॥१२॥
दिसते कां ही कोण लखलखे ? कळतें कां हें कसलें फांके ?
तेज दशदिशा एकसारिखें ?
'गुप्ती' ह्मणती । अहो हीच ती ! नजर ठरे कां इच्यावर ? ॥ १३॥
रविकिरणा जी परावर्तवी । अणुरेणुमधें तेजा पसरवि
तीक्ष्ण धार किति सदा ही नवी ?
क्षण चमचमतां । टिके कोणता ? । इच्यापुढें जग हरणार ! ॥१४॥
अजून अर्धी ही न खोलली । अवघी दुनिया तोंच उजळली !
उघडलीच जर पुढची सगळी
पिसें जगाला । जडेल सगळ्या । टकमक तिज तें बघणार ! ॥१५॥
मूळचीच ही माझ्या जवळ । असून विस्मृत होती केवळ !
ह्मणून ठरलों होतों दुर्बळ !
दरवेशाचा । सिंह कशाचा । सांपळ्यांत जो रमणार ! ॥ १६ ॥
क्षणभर चिडला तरि तें वाया । क्षणांत लागे तो खेळाया
शेंपुट घोळवि लोळे पायां ।
पोटासाठीं । गुपचुप पाठीं । दुबळ्यांचाही घे मार ! ॥ १७ ॥
देखत ऐकत माती ही कुडी । तरि तिजविषयीं जीवा गोडी
जडे तोंच त्या विस्मृति नाडी !
कीं दूरावें । जसें परावें । वैकुंठींचें माहेर ! ॥ १८ ॥

# ४ वियोगिनी.

## ( समस्यापूरण. )

[ माझ्या एका रसिक मित्रानें. " स्मरा स्मरविसी मना मळविसी देसी दुःखाला " ही एकच ओळ देऊन तिच्यावर कविता रचण्यास सांगितल्यावरून गेल्या महायुद्धकाळीं एका मराठ्या कुटुंबांत घडून आलेल्या गोष्टीच्या आधारें पुढील समस्यापूरण मी केलें आहे. ]

एकांत[1]–सुंदर मनोहर शुद्ध चित्त
तें तूर्ण संचित सरे जणुं बाल्य–वित्त!
ये यौवनाख्य[2] कटु घातक दुष्ट दैन्य
नाना विकार कुविचारवशें अधन्य!

× × ×

प्रेमाब्धि जो प्रणयिनी–तटिनी[3]–सतीचा
कीं जीव–बंधचि तिचा प्रथम–प्रतीचा
त्याचा वियोग जरि कालवशें घडेल
कालास निंद्य युवती न कशी गणेल?

× × ×

" स्मरा स्मरविसी मना मळविसी देसी दुःखाला "
काय मांडिली फजिती माझी रे निष्ठुर काला!
काय फायदा त्वां अबला ही छळून जोडावा
शत्रु आपल्या जोगा तरि करि खरा वीर डावा!
पुरुष ह्मणविसी; अबला छळणें काय तुझा धर्म?
दीनावन[4] हें पुरुषार्थाचें कसें विसरसी मर्म?

---

१ अत्यंत. २ तारुण्य नांवाचें. ३ नदी. ४ दीनांचें रक्षण

मोठ्या विनयें येथवरी तुज "जा जा" मी ह्मटलें
दावेदाऱ्या! पण तें कानीं तुझ्या शिरें कुठलें?
जातां जासि न कसा कोडगा! अखेरची बोली
खचित तुला मी आज शिव्यांची वाहिन लाखोली!
चळविपळें हीं तुझीं पावलें अचपल पळणारीं
काळा! झालीं लुलीं ढिलीं तीं आजचि केवि परी?
जुना पुराणा काळा तूं! तव वय झालें आतां
वारें गेलें पाय गळाले जणुं ये दुर्बलता!
तुझीं पावलें थकलीं तर मग तास, दिवस, मास,
अवयव बाकी कसे सरावे? न होय अजमास!
मेल्या! जाशिल तर जा अथवा रहा तुला, ऐदीं
छळूं पाहसी तर मी ग्रमे–वश होय न तव कैदी!"

× × ×

नको जिणें हें उणें एकलें पुरी पुरी विटलें!
मला पुरवलें असेंच माझे जर डोळे मिटले!
आज उद्यां वा परवां होइल खचित घरा येणें
या आशेवर कसें तरी मज अजवरि होय जिणें
चैन नसावी दिवसां रात्रीं झोंप न लागावी
अशा–खालतीं जीव किवणतां काय दशा व्हावी?
स्वप्नावरतीं स्वप्न पडावें गत गोष्टी–स्मरण
विचार नाना मनीं माजविति दारुण तेविं रण!
ते आठवती दिवस सुखाचे संगतींत गेले
कां अंतरलें त्या पाया अजि गूढ न हें उकलें!
तों सहसा मज होते बाधा न कळे कसलीशी
मंत्रा तंत्रा न वारवे जी न निघे मात्रेशीं

१ जीव देईन

मज तों स्मरतो स्मरसुंदर तो देह! जीव माझा!
स्वामी—राजा रणा वाहिला वीरांचा राजा!
जातिवंत तो हिरा आगळा सुंदर तेजाळ
शिरीं मिरवला अजवरि मी जों होय भाग्यकाळ

× × ×

काय भाल तें विशाल बाई! पूर्ण चंद्र साचा
ते डोळे कीं गुरुशुक्रांचा संगम नवलाचा!
नाक सरळ कीं भालेंदूनें[१] कर केलें खालीं
गमे लोभला घेउं गुलाबा जे फुलती गालीं!
ओठ दोन ते रक्तवेशधर जसे शिबंदीच
दंत रत्न—गृह—संरक्षक जे सावध नेहमिंच!
गुणाभिमानी पूर्ण इमानी ती सरळी मान
जी मानाचें निशाण साचें नेणें अपमान!
स्कंद—देश तो रुंद! भव्य तें वक्षःस्थल खालीं!
वीरोचित सद्विचार केवल करिति जिथें केली[२]!
मन तें निर्मल उदार विस्तृत पात्रचि गंगेचें
मत्प्रीतीची नौका ज्यावर निर्भय ही नाचे

× × ×

नाचे निर्भय सदा कशी मग आजचि ती सभया?
नकळे कां ही झोंके खाई भिडे तटां उभयां!
कळे अगाई! तोच कसाई काळ! कसब त्याचें
हें मज बाधे; होय कसेसें वदवेना वाचें!
त्या लहरी मज दिसतात पुढें उठल्या आदळती
आतां माझी नाजुक नौका कशी टिके पुढतीं?

१ भाल रूप चंद्रानें. २ खेळ, येरझार.

हाय! नवल हें काय पाहतें? काळिज हें चिरलें
मनःपात्र तें हेंच; यामधें कोण दुजें शिरलें!
कोणाची ही नौका परकी? यांत कशी आली?
वादळांत ही माझ्या नावे परी कां न पडली?
काय बघूं हें हाय हाय मी! दे धरणी ठाव!
अनंत विश्वें सहजीं धरशिल अशी तुझी मांव!
निर्मल निश्चल मनें पूजिले आजवरी भावें
तेंच एक पर! नांव कशाला सांगूं? तुज ठावें!
तीव्र व्रत तें माझें त्याचें होय असें चीज!
या डोळ्यांचे फिटे पारणें बघून हें आज!
हे सोहाळे पुरेत आतां! निजधामा जावें
कशास आतां बेचव जगतीं जिवा कष्टवावें?
काय उपाय कमी? गिरवावा तोच जुना कित्ता
संधि साधणें शिवूं न देतां भय सावध चित्ता!

× × ×

दीनेची कींव आली रजनिस अवघ्या ती जगा झोंप लावी
हाले ना पान कोठें; उचित गवसली संधि साधून घ्यावी
या भावें खंडिता ती लगबग उचली चोरट्या पावलांस
श्वासोच्छ्वासाहि रोधी बिचकत कितिदा दृष्टि दे आसपास!

× × ×

दोराचा फांस केला त्वरित निज-गळां घालि भावें स्मरून
देवा मागेः-"असू या प्रियकर मम हा नित्य सौख्यांत पूर्ण!"

---

१ सांठा. २ मरावें. ३ रात्र. ४ मनांत दुखावलेली.

ती निंदी आपणा कीं:—"बहु सुकृत न कां पूर्व जन्मींच केलें ?
येतीं पूर्वार्जितांच्या[1] परि मधुर फळें वा कडू योग्य काळें!

× × ×

येतें नाथा! असू द्या स्मरण चरणिंच्या दीन दासीजनाचें
जाऊं द्या जी स्वधामा[2] अजि नच उरलें काज कांहींच याचें!
हेवा—देवा कराया झुरत निशिदिनीं मी कशाला जगावें?"
हें बोले तोंच कूपीं[3] निज—तनु ढकलूं ती सजे सर्व—भावें.

× × ×

तों आला भव्य कोणी लगबग तरणाबांड तेथें शिपाई
पोटीं त्या खंडितेला दृढतर धरण्या तो उतावीळ होई!
अत्याश्चर्यें मुखा ती अवचित वळवी गोंधळे, हो सलज्ज;
तों बोले कांतः—"मुग्धे, सजलिस करण्या काय होतीस आज?"

× × ×

अत्यानंदें सतीचें घडिभरचि उडे भान तों होय जागी
लोलाक्षी[4] कांतदेहा[5] निरखित बिलगे रागिणी[6] ती कृशांगी[7]!
तें लज्जालास्य[8] आस्यीं, स्मितरुचि[9] अतुला, ती अहो चोरदृष्टि,
कोणी धन्यें पहावी कविविण इतरें,—आंधळ्या काय सृष्टि?

---

## ५ आहेर.

प्रेमामंत्रण पोंचलें, हरखलें मच्चित तें वाचतां
रामाचें व्रतबंध--कौतुक किती मातें न ये सांगतां!
यावें अक्षत टाकण्यास तिकडे ही हौस माझी तरी
बेडी आडवितें मला; विदित जी नामें जनीं नोकरी!

---

१ संचित प्राक्तन. २ निजधामा. ३ विहिरींत. ४ जिची नजर चंचल झाली आहे अशी. ५ प्रियकराच्या शरीराला. ६ प्रेम करणारी ७ रोडलेली. ८ लाजेनें तोंडावर येणारी ह्मणण्यापेक्षां नाचणारी शोभा ९ हंसणें.

देहाचा निरुपाय, तो जड; नडे त्याला पराधीनता
आतां आत्ममनोरथेंच समयीं येईन मी तत्वतां
देहें मंडपविष्ट मी न दिसतां तेथें जना दृष्टिला
हा सप्रेम करीन अप्रतिम घे आहेर माझा तुला!
हा आहेर अमोल, यासम दुजा लाभे क्वचिन्मंगल
'दे घे' चेच प्रकार पुष्कळ जगीं। या तो शिवे ना मल।
हा सोळा, धुतलाच तांदुळ जसा; त्याची स्पृहा हीच कीं-
मन्मित्रा सुख हो सदा मग असो दुःखांत मी कीं सुखीं।
जें पाणिग्रहणें क्षणांत रुजतें चित्तद्वयीं बीजसें
शुद्ध प्रेमचि पुत्ररूप-धर तें आलें फळाला जसें!
त्या शुद्धा सुफलास क्रीट अथवा ना दृष्टि बाधो कधीं
या साठीं व्रतबंध योग्य समयीं त्याचा करावा बुधीं!
संसारांत विवाहजन्य गणिलीं जीं मुख्य भाग्यें महा
पुत्रप्राप्ति वरिष्ठ त्यांत; पितरां कीं तींच मोक्षावहा!
त्या मोक्षावहना समर्थ करणें देणें महामंत्र तो
या नाम व्रतबंध, जो द्विजपणा विप्रार्भका आणितो!
हा देतां द्विज-भाव, त्या पटविणें सत्पुत्र कर्तव्य जें,
त्यामध्येंच खरें गुरुत्व वसतें श्रेष्ठांत जें पाहिजे!
गायित्री--कथनांत गूढ गवसे तें हेंच कीं बालकीं
मुख्यत्वें उपनीतता चढविणें ज्ञानार्पणानें निकीं
जें अव्याज वसे मनीं निज-जनासाठीं महा प्रेम तें
व्हावें व्यक्त; शुभ-प्रसंग मिष हें त्याला भलें शोभतें.
आहेरांतिल सार हेंच; पटलें हें ज्या जना तो कसें-
-पागोट्यास महत्व दे, गणिल वा शेला खरें बल्वसें?

वारंवार अशींच मंगल तुझ्या कार्यें घडावीं घरीं
सौभाग्यांत पडो सदा भर तुझ्या कीं श्रावणींच्या सरी!
सत्कार्यास करा सदा उभयतां व्हा ईश्वरा लाडकीं
भक्तांचे पुरवील त्याविण दुजा तो कोणता लाड कीं?
सुशीलाचा शेला क्षणभर तुझा तो न चिरको
कमी कां पागोट्या? अनुदिन तुझी बुद्धि चमको?
सुपारी वा पानें कवण गणिजे नारळ तसा
कृपा देवाची तों शुभ समय दाही शुभ दिशा!

---

## ६ मंगलाक्षता.

आतां तूं असशील वाचनपटू, शब्दार्थ ही जाणता
या पत्रांतिल अर्थ पूर्ण समजूं आहे तुझी योग्यता
दादाही तुज सांगतील नडलें कांहीं जरी यामधें
रामा, मी तुज चार शब्द लिहिले या चांगलें लक्ष्य दे!
" विद्या जोड भली, सदा गुरुपदीं तूं नम्र हो सादर
त्यांचा शब्द शिरीं धरीं तव हिता तोटा पडेना तर
भावंडांवर भावबद्ध—मन हो, रामा! गुणें गोडसा,
चालीचा सरळा, जनप्रिय, जगा कित्ताच तूं हो जसा;
नीतीची धरि कांस, सत्यवचनें तूं बोल गोडीं भलीं,
कर्तव्यास न चूक, चित्तसदनीं येऊं न देई कलि!
लोकांचें हित पाहणें—प्रथम तें, त्या मागुतीं आपुलें;
हा साधा हितमार्ग त्वां गिरविणें; हा नित्य, हें चांगलें!
देवाला भज, शुद्धभक्तिवश तो; त्याची कृपा लाभले—
ते झालेच भले, वरूनि सुयशें, सारीं तशीं मंगलें.

हे जाणून पुरें सदैव जगतीं तूं वाग, हो निश्चल.
देवो मंगल हा मुहुर्त तुज कीं मूर्त प्रभू मंगल!

## ७ आमंत्रण.

[ श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचें 'गीतोपायन' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध झालें त्याबरोबर तें मागविण्याची अनावर इच्छा झाली, श्री. तात्यासाहेबांच्या वाङ्मयसेवेच्या मानानें त्यांना वडील भावाचा मान देणें केव्हांहि योग्यच आहे, हें जाणून मी त्यांना खालील प्रमाणें सदर उपायनाची मागणी केली आहे. ]

### आर्या.

गीतोपायन धाडा, मज गरिबा रसिक–राज होऊं द्या!
श्रीपाद[1]–पाद–भजनें कां न घडे रंक आज, राव उद्यां?
वार्ता–मूल्यासह[2] या अष्टोत्तर एक आणका द्यावें
क्रीडोपाय[3] नवा मज, गीतोपायन मुला जसें द्यावें!
निज–मातृ–भारतीच्या–सदनीं[4] क्रीडेंत दंग जे कांहीं
तात्या त्यांत पुढारी, ज्येष्ठ भ्राता ह्मणूं जसा गेहीं!
खेळत खेळत त्यानें प्रेमानें गोड गायिलीं गाणीं
मज पोर! किति त्यांचें कौतुक वदतां थकेल हो वाणी!
थोरां सानें द्यावा नजराणा, लोक–रीत ही आहे
तात्या तेंच करी; दे गीतोपायन सरस्वतीला हें!
परि पोरबुद्धि माझी मानी मजलाचि होय नजराणा!
" नजराण्यास्तव राणा कीं राण्यास्तव जगांत नजराणा

१ श्रीविष्णूच्या पायाची सेवा केल्यानें, पक्षीं श्री कोल्हटकरांसारख्या अधिकारी साहित्याचार्यांची सेवा केल्यानें! २ टपालखर्च. ३ खेळणें. ४ मराठी भाषारूप आईच्या दारीं. ५ गीत–रूप नजराणा.

आणा मनीं कशाला? पोराचा बेफिकीरपण बाणा!
त्या बाण्यास्तव; अथवा नउ आण्यास्तव मला त्वरित धाडा
' गीतोपायन, ' माझी उत्कंठा मज करी जसा वेडा!

## ८ इंद्रधनुष्य.

[ उन्हाळ्यांतील दीर्घ दिनमान. आकस्मिक वळीव ढग. सूर्यलोप, मेघगर्जना. विजेचा चमचमाट, दिशालोप, किंचित् जलवर्षाव, तोंच इंद्रधनुष्योदय व अगदीं पडूं घातलेल्या पावसानें एकदम बदललेली दिशा, —हें लक्ष्यांत घेतांच, ही कविता कळण्यास सोपें जाईल. ]

**श्लोक.** वृत्त–मंदक्रांता

जोडी घोडे अरुण धुरिला जों न झाली सकाळ
कामें घामेजति रवि–तपीं, हो न त्या वाटचाल.
होवो कांहीं तरि न चुकणें स्वस्थलीं पोंचण्याला
तेणें हांकी हयं हळुहळूं; लांबवी तें दिनाला!
मोठ्या कष्टें रविरथ नभीं चालतां मंद मंद
दुर्दैवाचीं अवचितचि त्या फेरि पाडीच बंद!
काळे काळे भयकर पुढे वाटमारे उठून
वेढा देती, अडविति रथा, देति सूर्या कळूं न!
त्या दुष्टांनीं सहज चुरिलें भव्य दिव्या रथातें,
नाहीं ठावें अरुण दुबळा गाढिला काय कीं तें!
तो सोन्याचा मुकुट, रविचा भर्जरी वेष सारा,
चोळा बोळा--न घडि सरली तोंच--झाला बिचारा!
'गाढा गाढो'! भयद उठली तोंच मोठी अरोळी
जीनें कानीं सहज बसली सर्व-लोकांस टाळी!

---

१ घोडे. सूर्याचे घोडे हळूहळू चालूं लागल्यानें दिवस लांबला हा भाव, २ जमीनींत पुरणें, पक्षीं गडगडणें, नादसादृश्य!

तो मातीला सविभव मिळे सूर्य सारा बघून
अत्यानंदें विकट हंसती दुष्ट लज्जाविहीन!
त्या हास्याचा ध्वनि दुमदुमे व्यापि दिग्भाग दाही
दिग्देवींची सुकुनि वदनें, लोचनें नीर वाही!
त्या भ्याल्या कीं, 'अवचित अशी दुर्दशा कां रवीची—
झाली? किंवा विधिलिखित तें काय थोरांहि जांची?'

एकाएकीं न कळत नभोमध्यभागीं प्रचंड
नाना वर्णीं सरस विलसूं लागले चाप-खंड
त्या चापोंचा परि नच दिसे योजिता शोधितांही
आश्चर्ये मी करिं कुतुक कीं कोण हो देवता ही?
त्या चापा जों न घडि घडली लागुनी तें दिसाया
दाणादाणी उडत, सुटले वाटमारे पळाया!
त्या हातींच्या चमकति किती कोलत्यां धांवतांना
एकांमेकां थडकति, उठे नाद, कोंदे दिशांना!
सूर्याला तों त्वरित कळलें देवता गुप्त कोणीं
आली कालीं उचित करण्या सोह्य तें चापबाणीं
'दावूं लोकां मुख तरि कसें? मी असा शत्रु-दांत!"
तो डोंकावे हळुहळु, जणूं सूर्य लाजे मनांत!
सारे काळे मद-मलिन ते चोरटे मार खात
दुःखाश्रूनीं भिजवित धरा, रोदनें नादवीत—
दिग्भागांना; घडि न पुरती जाय तों मागमूस—
त्यांचा राहे तिळहि न, असे पांगले आसपास!

१ बीज लवणें. २ इंद्रधनुष्याचा. ३ मेघ. ज्यांनीं सूर्याची वाट धरून मारली होती. ४ वीज चकमकणारी. ५ मदत ६ मदानें अंध झालेले मळलेले.

" ध्या वारा प्याच पाणी घडिभर तरिही चैन नाहीं जिवाला
कंटाळा ये उन्हाळीं दिवस न सरतां तो सरे लांबलेला!
तों मेघीं सूर्य लोपे, घन दुमदुमले, थेंब हीं चार आले;
तों व्योगीं इंद्रचाप प्रकटुनि, दडतां मेघ—हें काव्य झालें!

## ९. तेजस्विता.

भो यदि भवति भवतु मरणम् । सहते नैव कदा ।
सहजगुणपरिभवम् । तेजस्वी यो निपुणम् ॥ ध्रु० ॥
मधुतरगंधं किरति चंदनम् । घृष्टं यदैव सुतराम् ।
धत्ते कांचनमधिकाम् शोभाम् । अग्निपरीक्षितवर्णम् ॥ १ ॥

## १०. निशाणवाला.

[ प्रगतीच्या वाटेंत आळस, कुसंगति, जननिंदा सामाजिक प्राबल्य, प्रतिष्ठित पुराणरूढी, राजसत्ता, गुप्त हितशत्रु वगैरे काय थोडीं संकटें असतात? तथापि खरा ध्येयनिष्ठ प्रागतिक आपला मार्ग त्यांतूनच कसा काढीत असतो त्याचें चित्र यथामति खालीं काढलें आहे. ]

पद [ चाल:—जरि नाहिं कमल तें करीं. ]

प्रगतिचें घरीं मी निशाण । जीव कीं प्राण । मला तें प्यारें
स्वातंत्र्य-बोध करणारें! ॥ १ ॥

तें स्वतंत्र वारें पीत । मला पाजीत । गोड तो घुटका
लावितें मनाला चटका! ॥ २ ॥

फाडिलें स्वार्थ-पट भलें । तेंच लाविलें । शील—काष्ठाला
मी सजलों निशाण—वाला! ॥ ३ ॥

सोडून बेकिचें चमडें । बनविले जोडे । जाड वळकटसे
रगडून तुडविण्या खासे! ॥ ४ ॥

देशाभिमान दांडगा । उंच जणु बडगा । घेतला हातीं
चाललों मोहिमे वरतीं ॥ ५ ॥
हें निशाण माझ्या करीं । असें तोंवरीं । मी न थकणार
सारखा पुढें जाणार ॥ ६ ॥
या दिला दिलाचा वाण । कशाची वाण । मला मग उरली?
ही धरणी लंघिन सगळी! ॥ ७ ॥
आडवो मला वाढता । विंध्यपर्वता—सारखा अलस ।
लंघीन सहज तरि त्यास! ॥ ८ ॥
लोटून धूळ डोळ्यांत । मला भुलवोत । वादळें दुष्ट ।
काढीन अचुक पण वाट! ॥ ९ ॥
निंदेस चहूं दे पूर । असो भर—पूर! । त्यांत तरणारा ।
मी स्त्रीला त्या न भिणारा! ॥ १० ॥
तो समुद्र खवळो फार । मी न डरणार । त्या मदोन्मत्ता ।
मनसोक्त चारितों लत्ता! ॥ ११ ॥
जलचरें मला डंसणार! कींव करणार—। मीच कीं त्यांची!
बापुडीं मर्त्य जातीचीं! ॥ १२ ॥
अजगरें मला बांधून । काय हो न्यून? त्यामुळें उलट
मीच होय दसपट धीट? ॥ १३ ॥
मारोत मारिते बाण । मला आडून । पण नसे त्याची
मज मुळींच परवा साची! ॥ १४ ॥
येवोच सिंह चालून. । तरिहि ज्या भय न । त्या मला भिववूं
दारिंचें शके कां "भूः भूः!" ॥ १५ ॥
मी असा अभय बळवंत । अखंडित पंथ । नीट आंखून
जाणार खूण रोखून! ॥ १६ ॥

मग देहपात ही त्यांत । इष्ट अत्यंत! खचित त्याहून
कोणचें अमृत हो आन[1]? ॥ १७ ॥

---

## ११ पिंडीवरचे विंचू.

[ खुद्द घरधन्याकडून सन्मान पावणाऱ्याचाच त्याच घरांतील यः कश्चित् हुजऱ्याकडूनही कधीं कधीं अपमान होत असतो. अशा अपमानितांलाच पिंडीवरच्या विंचवाच्या विषाची खरी जाणीव असते. ]

**पद** [ चाल—राम भजन कर लेना० ]

विंचू पिंडीवरले । जगतीं । जेथें तेथें भरले! ॥ ध्रु० ॥
सदाशिवाला भोळया भावें कवटाळूं जावें ।
भक्तहृदीं तो डंख नेमका होतो काय करावें? ॥ १ ॥
विष्णुपदाची हाव धरावी शेषशयन पण तो--।
अफाट दर्या त्यांत आडवा, भक्त वृथा शिणतो! ॥ २ ॥
ब्रह्मदेव तर चहुं तोंडांचा काय भरंसा त्याचा ।
कन्येवरही डोळा ठेवी मुकुटमणिच पापांचा! ॥ ३ ॥
लक्ष्मीपाशीं जावें ह्मटलें, पण मुलखाची चपला ।
मायेचा तो पूत कोणचा जो तिज संतत रुचला? ॥ ४ ॥
तिची कशाला गोष्ट पाहिजे बापाची लेक ।
सुधाकांमुका[2] विष तो देई! वळखा आंतिल मेख! ॥ ५ ॥
थोराथोरांच्या ह्या गोष्टी,--काय कथा इतरांची ? ।
सदोषता किंबहुना खूणचि समजा या जगताची! ॥ ६ ॥

---

१ दुसरें. २ अमृतासाठीं मंथन करणाऱ्या देवांना विष मिळाले.

# १२ जन्मरहस्य.

[ स्वभगिनीच्या सुखप्रसूतीनें निश्चिंत झालेला बंधु आपल्या नव-जात भाच्यास--स्वराजाच्या या उषःकालीं अवतरणाऱ्या हिंदु पुत्रास,-" जन्य रहस्य " ह्मणून आज वेगळें काय सांगणार? ]

**श्लोक.** [ **वृत्त**—शिखरिणी. ]

उषेचा हा बाळा, किति शुभ तुझा जन्म—समय!
निवे अस्मच्चिन्ता सहज मन झालें सुख—मय.

प्रभूला आभारी नत कर जुळूं, त्याच सदया
ह्मणूं:--" देवा, ठेवा सुखित जननी बाळ उभयां " ! ॥१॥

" तुझ्या मातेची तूं सहज सुटका केलिस--" असें
वदे कोणीं, त्यानें कुतुक मज भारी गमतसे!

तुझ्या हातीं बाळा, त्वरित जननी मुक्त घडली
तुझी ही भू-माता करिशिल कधीं सांग तसली? ॥ २ ॥

तुझी माता एका तुजचि नवमासां वहतसे
सदा—ही भू वाही पण तुज, तुझे पूर्वज तसे;
पुढें ही त्वद्वंशीं उपजतिल जे त्यांहि खचित;
इच्या उद्धाराचा तर धर मनीं हेतु उचित! ॥ ३ ॥

उष:कालीं येतां अरुण उदया संहरि तम
निवारी निद्रेला सुचवि जगता योग्य उदिम[1]
स्वतेजें विश्वाला दिपवि, यश लोकीं पसरवी;
तुला सन्मार्गा त्वत्सहज[2] रवि कीं काय शिकवी! ॥ ४ ॥

१ उद्योग धंदा २ तुझ्या बरोबरच उगवलेला.

वृत्त:--मंदाक्रांता.

भू-माता ही परवश असे पार भारावलेली
सत्पुत्रांनीं त्वरित तिजला पाहिजे मुक्त केली
या स्फूर्तीचा प्रियकर उषःकाल हा जन्मकाल
बाळा, देवें बघ तुज दिला हेतु गर्भी विशाल ! ॥ ५ ॥

---

## १३ कन्या-दान.

[ कन्यादान हें स्वप्राण काढून दान करण्याइतकेंच अवघड आहे हें कालिदासानें शकुंतलेच्या कण्वासारख्या उसन्या बापाची देखील झालेली दुर्दशा वर्णून सांगितलें आहे. सांसारिक बापाच्या आंतड्यांचा पीळ कसा असतो हें खालील कवितेंत बापाकडूनच कळविण्याचा प्रयत्न केला आहे. ]

बाळे, संतत वागवून इतकी मी थोर केली तुला
ज्यांनीं ते कर हेच निर्दय दुज्या देणार गे आजला !
घेणारा पण योग्य हा वर मिळे संतोष यानें मला !
दुःखें कीं हरिखें कथूं मज न ये डोळा गळूं लागला !
पाणी काळिज होय तेंच नयनीं हातांतही वाहतें
त्रेधा वाहन-मार्ग कारण तरी सर्वांसही एकटें !
वात्सल्याऽख्य हिमाचलीं उगवली आहे त्रिवेणीच ही !
बाळे, हींत नहा, अमंगल नुरो देहीं मनीं लेशही !
स्नानें शुद्ध अशी मनीं भज मुली गौरीहरा भाविका
गौरीची पतिभक्ति निस्तुल तुझ्या बिंबो मनीं सात्विका !
हो कार्यक्षम गेहिनी, उजव तूं दोन्ही कुळें आपलीं
हें केलेंस तरीच सार्थ ममता माझी तुला वाहिली !

भेदातीत सदा पदार्थसहिता छाया जशी त्यापरी
संसारीं रत एकचित्त पतिशीं होऊन दारीं घरीं
जोडी उत्तम लोक, कंठ भरला वाणीहि आतां थके!
कीं माझी नुरलीस आज, परकी झालीस गे लाडके!
जा बाळे निज जीवितेश–सदनी रंगू सबाह्यांतर
आतां हें घर ना तुझें जन ह्मणे ' माहेर ' या नंतर!
आह्मां त्वन्मुख–चंद्रदर्शन पुन्हा कार्य-प्रसंगें कदा
माहेरीं तुज आणल्यासाचि घडे,--जें लभ्य होतें सदा!
वासुदेवें[1] सदनीं रत कर्मीं
वत्सलांछित[2] जशी प्रति लक्ष्मी!
नेत्र हे तुज कधीं बघतील?
कौतुकाकुल पुरे निवतील!

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ३१९९

## १४ तूं कोण?

### श्लोक. [ वृत्त. शार्दूल वि. ]

[ आपल्या दारावरून वाजत जाणारी मिरवणूक कोणत्या बालमनाला चटकन् दाराशीं आणून उभें करीत नाहीं? अल्पवयींच वैधव्य आलें तरी बाल्यसुलभ चापल्य थोडेंच मावळतें आहे? विचारी कौतुकानें दारीं धांवली पण त्याच पावलीं जड मनानें घरीं परतली.! ]

हीं आतां झडतीं तशींच झडलीं वाद्यें तदा मंगल
सोहाळ्यांतहि हीच व्याहिविहिणीमध्यें उडे दंगल!
या थाटांतचि ती वरात मिरवे, जोडाहि होता असा!
" होता " या वचनांत सर्व समजा हा काल आहे कसा!

---

१ वराचें नांव; पक्षीं श्रीविष्णु २ मुलानें युक्त असणारी; पक्षीं श्रीविष्णूच्या हृदयालिंगनानें वत्स-लांछन पावलेली.!

ही दारू उडते तशीच उडली तेव्हां किती सुंदर!
जागोजाग असेच नारळ भुतांखेतां दिले शंभर!
पाहूं लोक असेच कौतुकभरें धावून आले पथीं
हा! त्यांनांच न आज तोंड वघवे माझें, किती शापिती!
'लक्ष्मी विष्णुच हीं, वधूवर नव्हे':—भावें अशा पूजिती,
आह्मांला मधुपर्क देत गृहिणी श्रद्धाळु मार्गी किती!
लक्ष्मी हेंच अजून नांव मजला आहे प्रचारीं तरी
सारे मानिति हाय कां अवदसा मी साच! दारीं घरीं!
हा चाले मिरवीत आज रथ तो तेव्हांहि या सारखा
नेत्रक्षेप असाच त्याहि भिडला जोडीमधें सारखा!
वस्त्रांची असलीच गांठ सुदृढा होती वृथा घातली!
माझें वस्त्रचि काळ ओढि, उघडी मी हो जगावेगळी!
वस्त्र आभरणें अशींच उभयां आह्मां तदा शोभत
शेजारींच अशी सलज्ज वसतें मी अंग चो-चोरित!
आनंदात अशींच कैक वसलीं बाळें रथीं भोवतीं
चेष्टा ही असल्याच चालति, कथूं त्यांची न येते मिति!
तेव्हांच सगळेंच मंगल, तशी माहे पुरीं मंगल.
आतां सर्वचि का अमंगल? कशी आलेंच मी ओंगळ!
तेव्हांचाच अजून काळ पण हा; मी तीच आहे तरी
शोकभ्रांत मनासि संशय पडे " तूं कोण, " पृच्छा करी!

आधींच मग्न पुरती निज यातनांत।
जी मी तिला फिरफिरून विचारण्यांत।
"तूं कोण!" काय सुख हो तुज मानसा रे?।
माझें उजाड वघ भाळ, कळेल सारें!।

# १५ मोहनमाळ.

[ नोकरी करित असतांनां बदल्यामुळें गांवोगांव फिरणाऱ्या मनुष्यावर केव्हां ना केव्हां तरी आपल्या मुलांमाणसांचा वियोग सोसण्याची पाळी- येतेच. प्रस्तुत नायकाची अशीच स्थिती झाल्यामुळें तो नायिकेच्या भेटी विषयीं अत्यातुर झाला; बरेच अडथळे-उदाहरणार्थ. रजा न मिळणें, घरची परिस्थिति अनुकूल नसणें वगैरे तरून तो नायिकेस भेटूं शकला ! ]

## पद.

सह्यागिरीच्या उपगिरिपैकीं एका गिरिच्या तळव्यांत
वसल्यानें तुज तुंग चढे या तुंबळ पाऊस-काळांत ! ॥ १ ॥
थेंबें थेंबें रोज भर पडे काल लोटतां सहज-गति
तुला तलावा, आली उसळत कांठाकांठ पुरी भरती ! ॥ २ ॥
पोटीं पाणी मावेना नें बघे पडाया बाहेर
एकाजागीं पळाइ ठरेना फिरू लागले चौफेर ! ॥ ३ ॥
होऊं लागे तुला कसेंसें; न कळत कोणी कडून तों
मार[1] फुलांचा बसूं लागला भडिमार कसा वानूं तो ! ॥ ४ ॥
मुका मार तो सोसेना तुज उहरीवर उठल्या लहरी
काकुळतीला तुझा जीव ये खुशी वाट गवसे न तरी ! ॥ ५ ॥
" अरे केशवा[2] ! पाव; केधवां कींव तुला येणार नरें ?
पत्र-पुष्प[3] जें तुला वाहिलें फुकटचि जावें तें कां रे ? ॥ ६ ॥
दीन लेकरूं धांवा करितां मनांत केशव तो द्रवला
गरुड[4]-पत्र तो वेगें येतां तलाव चित्तीं सुखावला ! ॥ ७ ॥

---

१ मदन. २ हें बापाचें नांव आहे; पक्षीं श्री विष्णु. ३ पत्र म्हणजे कार्ड हेंच कोणी फूल; पक्षीं पान फूल वाहिलें. ४ गरुडासारखें वेगानें आलेलें पत्र; पक्षीं गरुड आहे वाहन ज्याचें तो केशव !

नदीस मिळण्या वांव पावतां तलाव धांवाचि घे सहसा
लहरी वरतीं लहरी उठल्या वाटे टाकी उड्या जसा! ॥ ८ ॥
वारा पाउस अंधाराची मध्यरात्र ही भीति न दे
भीक मिळेना भूतांखेतां; वाटेवर फसले सोदे! ॥ ९ ॥
डोंगर, खिंडी, लवणें, टेंकें वाटेंतिल ओलांडून
नदीस मिळतांक्षणीं उतावीळ तलाव गेला हरखून! ॥१०॥

× × ×

सुखसंगास्तव ही तूज अकरा पुतळ्यांची मोहनमाळ
अर्पण केली प्रीतिदेविच्या हृदयीं खेळो चिरकाळ!

---

## १६ त्वरित मावळलेंस कसें फुला?

[ माझ्या एका स्नेह्यास एका सूर्योदयीं प्रथमपुत्र झाला—पेढे वांटले पण तोंच सूर्य नभोमध्यासहि जाण्यापूर्वींच त्या मुलाला मूठमाती द्यावी लागली! ]

**श्लोक.** [ वृत्त—द्रुत० विलं० ]

तुजसवें उदया रवि पावला । बघ अजूनहि तो वर चालला!
जननिचा तुज अंक न लाभला! । त्वरित मावळलेंस कसें फुला?
सुमसुगंध—सुगंधित मारुत । विहरतो झुलवीत वनाप्रत ।
अचल जंगमसंघ मुदावला! त्वरित मावळलेंस कसें फुला?
तव मुखा बघतां जननी मुखीं । विलसलें मृदु हास्य किती सुखीं
हससि तोंच कसा रुससी मुला? । त्वरित मावळलेंस कसें फुला?
रुससि कां सहसा न कळे तरी । समजवूं झटलीच परोपरी!
पण हताश करून त्रिचारिला । त्वरित मावळलेंस कसें फुला?

तव मुखा बघण्या सरसावली । सकुतुका तितकी नच मावली
उगवत्या रविलाहि तुझी मुला! । त्वरित मावळलेंस कसें फुला?
मन तदा भरलें कुतुकें तिचें । अजि शुचें तितकेंच विचारिचें!
भर उरीं उभयाधिक दाटला! । त्वरित मावळलेंस कसें फुला?
भर उरीं चढला पय सांडलें । मिळत मातिस गांठिल सत्य तें
तुजासि; मृण्मय तूं जर तानुल्या! । त्वरित मावळलेंस कसें फुला?
उघड तूं बुडलास रसातलीं । जग म्हणे पण "सद्गति लाभली!"
वच कसें विपरीत पटे मला? । त्वरित मावळलेंस कसें फुला?
सुगति लाभ असा सहजीं घडे । मज गमे नच शक्यहि एवढें
असासि दिव्य खराच मुळांतला! । त्वरित मावळलेंस कसें फुला?
जग असे कसलें? कुतुकें अशा । उतरलास बघूं इथली दशा
नयन दिव्यहि तों तव झांकलां! । त्वरित मावळलेंस कसें फुला?
जग दिसे तुज हें अति पातकी । तुजासि जें बघवे क्षणही न कीं
वसति–योग्य धरा न अमंगला! । त्वरित मावळलेंस कसें फुला?
जग दिसे न दिसें इतक्यामध्ये । करिसि तत्वपरीक्षण तूं सुधे!
तव अलौकिक कीं मति उज्ज्वला । त्वरित मावळलेंस कसें फुला?
मति अलौकिक ती नसती तर । न घडते परके जन आतुर.
नच रडे जननी तव केवला! । त्वरित मावळलेंस कसें फुला?
जग गणी अति कोमल जीं फुलें । नच अजून कशीं सुकलीं बरें?
फुल उगीच गमे गाणि मी तुला! । त्वरित मावळलेंस कसें फुला?

× × ×

नर–जीवित–पुष्प कोमल । हरिपायीं समयींच वाहणें
सुकलें जर तें अनर्पित । मिति शोका मग कोण राहणें?

# १७ सलगीचा सवाल!

[ निकृष्ट आणि परार्त आर्यावर्तांत उत्सुक कार्यकर्त्याला आजन्म पुरून उरेल इतकें काम आज आहे हें कळून संवरूनही ' काय करावें ' या कोड्यांत पडल्यामुळेंच जणुं कमरेवर हात देऊन खुशाल उभा राहिलेल्या आणि मूळ ' घनश्याम ' असतांनाही आजच फिरल्या कालानुरूप आपलें नांव फिरवून ' पांडुरंग ' ह्मणवणाऱ्या पंढरीरायाला आमचा हा कळकळीचा पण सलगीचा सवाल आहे. ]

**पद.** [ चालः- घुबडा, बोल रे घूघू! ]

आतां पाव कीं नच पाव--तुझा उमगला डाव, देवा! ॥ ध्रु० ॥
चक्र तव कुठें? काय भंगलें? । तपस्विभीष्में कीं वद गिळिलें?
गिळल्यावर तुज परतें कसलें? । कीं ये परतहि पण परचक्रा[1]
जणुं मी टाकी ठाव? ॥ देवा० ॥ १ ॥

स्वजनीं वीरश्री जो स्फुरवी । गर्जत परकीं हृदयें हदरवि
शंख तव मुका कां? मुख चुकवी? । पांचजन्य[2] घे पंचत्वा कीं?
मरण जगत्सहभाव[3]? ॥ २ ॥

गदा तव करीं होती ना रे? । वृथाच शंका मन घे न बरें?
विदित 'गदाधर' नांव तव खरें! । जुनी भंगली असे कदाचित्-
ह्मणून हा तदभाव! ॥ ३ ॥

दुःखिता जवें हर्षविणारें । उज्वल 'नंदक' नाम करि खरें ।
खड्ग तव मला कां न दिसे रे? । काय गंजलें, दिलें कुणा कीं--
ह्मणून "साणे लॉव" ॥ ४ ॥

---

१ परक्यांचा हल्ला. २ पंचमहाभूतात्मक ह्मणून नश्वर! ३ जगाचा स्वभाव ४ सहाणेवर धार लावण्यासाठीं.

धारेसाठीं तिकडे पडलें । अजून मागें तूं न आणिलें! ।
त्रिकालज्ञ तूं त्यांत तुज कळे । सद्यःकाळीं शांतिच सगळी--
नको हत्यारीं हांव! ॥ ५ ॥

कारण नसतां ओझीं हातीं । कुणी वागवा लोखंडें तीं?
वरी आजची नाजुक रीति! । खुशाल कटिवर ठेवावे कर
हाच तुझा कीं भाव? ॥ ६ ॥

'घनश्याम'[१] तूं स्पष्ट दिसाया । 'पांडुरंग[२] पण पंढरिराया ।
स्वतास म्हणाविसि, जाणासि समया! । काळ्या रंगा उबगलास कीं
पालटलें जें नांव? ॥ ७ ॥

काळ बदलतां नांव बदललें । जुनें आपलें दूर दवडिलें ।
नवें कौतुकें उरीं कवळलें । काळ्यांची धुळधाण, चलती--
गोऱ्यांची भरधांव! ॥ ८ ॥

अविकारी तूं म्हणून ख्याती । ऐकिली पुरी खोटी कीं ती! ।
विकार उपजवि तुजहि परिस्थिति! । पर तेजानें[३] दिधल्या होतें
सहज नकोसें नांव! ॥ ९ ॥

खराच किंवा तूं अविकार? । सहज कीं द्रवे जो सविकार
कामा लागे कसून सत्वर । सर्वसमर्था कार्य कळेना?
उभा जसा रडराव! ॥ १० ॥

"काय करावें?" हें तुज कोडें । छेः सर्वज्ञा कसें रे पडे? ।
किंवा आळस तुझा तुज नडे; । अशांत लक्ष्मीचाही कोणी
धीट करील लिलांव! ॥ ११ ॥

१ मेघाप्रमाणें काळा २ पांढऱ्या-गोऱ्या रंगाचा! ३ पाश्चात्य सुधारणेला भुलून आपल्या मुला बाळांचीं 'जॉर्ज, जोसेफ' असलीं नांवें ठेवणारे कित्येक आहेत.

तुला वसे ती कां सोडून? । कशास सांगूं मी उघडून ।
ज्याची त्याला ठावी खूण! । चपलांपतिच्या[1] कर्तृत्वाचा
असाच नुसता आंव! ॥ १२ ॥

घरच्या गोष्टी तुझ्या काढल्या । बरें नसें हें माहित मजला ।
निरुपाय मला पण तूं केला । किती सताविसि? तुज न दिसे कां-
बुडे आमची नांव? ॥ १३ ॥

भले आजवर बोल वेंचलें । त्यांची मात्रा तुजवर न चले ।
अंजनाविणें भागे कसलें? । ऊठ, ना तरी अधिक विषारी
तुजवर पडतिल घाव! ॥ १४ ॥

सुखें संत जगु आज जेवती! । औषधाहि खल आज न मिळती
जणुं धर्माची चाले चलती! । ' संभवाम्यहं[2] युगे युगे ' चें
आज काय घ्या नांव? ॥ १५ ॥

किंवा बसल्या बसल्या झोडा । अशाच पैकीं काय लबाडा! ।
अवताराच्या तव रे बाडा? । खुळ्या जगा नच कळे तदा जणुं
तुझा खोल जो डाव! ॥ १६ ॥

भिस्त तुझ्यावर खुळ्या जगाची । म्हणून तें तुज अजून यांची[3] ।
परवा पण तुज लव नच त्याची । सुखासनीं तूं उभा! जळो जग,
रडो म्हणो वा धांव! ॥ १७ ॥

खचित जगा कीं जडलें वेड । गणी देव तें दगडा उघड ।
ह्मणें " धांव बा मारचि दौड " । जडा चपळपण यावें म्हणणें
वेडचि त्याचें नांव! ॥ १८ ॥

१ चचल स्त्रीचे नवरे कसे दीन होतात हे सांगावयाला नकोच! २ गीतेमध्यें सांगितलेलीं अवतारापूर्वीचीं सारीं लक्षणें आज विद्यमान असून अवतार होत नाहीं तें कां हा भाव? ३ याचना करितें.

देवपण तुला जुनें असेल । सरलें पण तें; नवीन काल—
येतां शिकसि नवी तूं चाल! । नाजुक होसी पुरता हौशी
न सहे धांवाधांव! ॥ १९ ॥

नव काळें कीं आडहत्यारी[1] । केला त्याचा ताबा तुजवरी ।
तुला उभविला उगा विटेवरी! । वडव्यांच्या[2] कुलुपांत वस पण
म्हणवि पंढरीराव! ॥ २० ॥

मुखीं मिशांचें वसविति गांव । कुलशीळाचा पोकळ आंव ।
पराक्रमाविण म्हणविति 'राव' । जे अजि, त्यांतलाच तूं—
पोषाखी उमराव! ॥ २१ ॥

देवपणाला आंचवलेला । 'साखरलोण्या' सोकवलेला ।
विटेवरी निःशस्त्र उभविला । सत्तेचा तूं गुलाम! तुज कीं
शस्त्र न धरण्या वांव! ॥ २२ ॥

दिससि तसा तूं खराच दगड । होसि पुरा तर नाहीं मग नड
कीं निंदा स्तुति सम समजे जड । देवपणा लव असेल तर तो
अजून कामीं लाव! ॥ २३ ॥

---

## १८ घटमहिमा.

### श्लोक [ वृत्त—वंशस्थ. ]

रसातळाला[3] जरि जासि आपण । परोपकारीं रत तूं घटा, पण!
गुणाश्रयें[4] ये वरती महाशयें[5] । तुझ्या चरित्रांतिल हाच आशय!

---

१ ज्याचें हातचें हत्यार काढून घेतलें आहे असा. २ वडव्यांच्या ह्मणजे पूजाऱ्यांच्या ताब्यांत रहावयाचें पण ह्मणावयाचे मात्र पंढरीचा राजा! ३ सर्वस्वी नाश पावणें; पक्षीं विहिरीच्या तळाला जाणें. ४ गुणांच्या योगें, पक्षीं रहाटास लावलेल्या दोराच्या आश्रयानें. ५ मोठ्या मनाचा; पक्षीं मोठ्या साठ्यांचा.

धरून हातीं तव कंठ पालथा[1] । तुला निजार्थी जन होय घालता
बचून पाण्यां[2]तहि त्यासि तारिसी । परोपकारें अपकार फेडिसी !
खुशाल घालोत गळ्यांत दोरणी । तुला पिपासू बुडवोत धोरणी[3] !
पया निजौष्ठस्थ[4]हि देसि त्या तरी । भल्याबुऱ्या तोषद सारख्यापरि
जसें जसें ये जल तें तवोदरीं । तसा तसा हर्षनिनाद[5] ये वरी
सुपूर्ण होतांच पथास लागला । परोपकारीं न विलंब कीं भला !
जलागमें हर्ष तसा तदत्ययें । तुझी निनादीं समता करून ये
जिथें कधीं स्वार्थ नसेच माहित । सदा स्वभावें मन तें समाहित[6]
परोपकारार्थ वहासि जीवन[7] । कसा शिरोधार्य न होइ सज्जन ?
पयोधरा[8], पूर्जित[9] देव-पूजनीं । तुलाच आधीं; गुण पूज्य कीं जनीं
न धन्य रत्नाकर[10] तूं जसा घटा !। धरून पोटीं तव पुत्र[11] एकटा !
सरत्न ही सागर जो सलील पी । कथूं यशा [12]गी न शके लिहूं लिपी !
कुलाल[13] निर्मी घट हा महाशय । घटांत लोकोत्तर हो सुतोदय ।
पित्यास जे पुत्र यशें दुणाविती । जगांत त्यांना कवि कां न वानिती ? ॥

× × ×

मज घट महिमा हा वानिता ये तसाच ।
अनुदिन वळवाया काय येईल साच ?
अनुचित पण शंका; बुद्धिदाता समर्थ ।
प्रभु पदविनताचे साधितो सर्व अर्थ !

---

१ पोहण्यास शिकणारे लोक पालथ्या घागरीवरून शिकतात. २ पाण्यांत. पहाणें=वैरं करणें; पक्षीं पाण्यांत पोहत असतांना पाहून. ३ धोरण पाहून; पक्षीं इथें नाहीं बुडली तर तिथें असें ४ आपल्या तोंडचें ! ५ भरतांना घागर वाजते. ६ समाधान पावलेलें ७ आयुष्य; पक्षीं पाणी ८ डोक्यावर वहाण्या जोगा ९ पाण्यानें भरलेला; देव-पूजेमध्यें आधीं कलशपूजा असतें हें प्रसिद्ध आहे. १० समुद्र. ११ अगास्ति. १२ वाणी १३ कुंभार.

# १९ तिलांजलि !

[ कै. गु. दत्तात्रय पांडुरंग प्राणी, न्यायाधीश मिरज, यांना तिलांजलि देऊन ऋणमुक्त व्हावें हें मला कसेंसेंच वाटलें यांत नवल काय? असल्या उदार आत्म्यांचें ऋण मी पामरानें काय फेडावें? त्यापेक्षां त्यांच्या ऋणांतच राहणें अधिक श्रेयस्कर नव्हे काय? ]

**पद** [ चालः—चारा सोडुनिया. ]

हे तिळ, हें पाणी। खिन्न पणीं। सोडूं या हातांनीं!॥ ध्रु० ॥
प्रसंग हा काय। दुःखमय। अवचित[1] मजवर हाय? ॥ १ ॥
गेले निजधामा। कीं मामा। अंतरले हो आह्मा! ॥ २ ॥
लपली धर्माची। शीलाची। मूर्ति सदाचाराची! ॥ ३ ॥
भूत–दया–मेघ। तो अनघ[2]। जिरला, हाय! सवेग ॥ ४ ॥
अंग घननील। तरि अचल—अंतरंग विमल! ॥ ५ ॥
मुख–कमलीं विलसे। स्मित खासें। अभंग मानस तोषें ॥ ६ ॥
वामन[3] आकृतिचा। पण कृतिचा। उदार बळि जो साचा! ॥ ७ ॥
प्राणी–कुल–तरणि!। जो प्राणी। सार्थ नाम भुवनीं ॥ ८ ॥
न्यायी अत्यंत। दृढनिष्ठ। निःस्पृह, निर्भय, शांत! ॥ ९ ॥
शांति समुद्राची। ती त्याची। वृत्ति तपोधन मुनिची!॥ १० ॥
लोकप्रिय जितका। तो तितका। राज–प्रिय ही देखा!॥ ११ ॥
निज गुण महिम्यानें। अतुलानें। मिरज रडे यन्मरणें!॥ १२ ॥
विद्या–कुंज–वनीं। कृष्ण गुणी। खेळे जो दिन रजनीं ॥ १३ ॥
विद्यार्थी[4] गवळी। जणु जवळी। प्रेमें घे वनमाळी ॥ १४ ॥
दे विद्याग्रास। क्षुधितांस। पोट भरेसे सुरस! ॥ १५ ॥

---

१ कै. गु. प्राणी यांचा मृत्यु अवचित ह्मणजे कचेरींतून काम संपवून घरीं जात असतां वाटेंतच पडून झाला. २ निष्पाप. ३ खुजा ४ त्यांना शिकविण्याची हौस व हतोटी फारच चांगली असे.

असला गुरुराय । मम सदय । तच्चरणीं मम हृदय ॥ १६ ॥
गेलें गुंतून । कितिक दिन । आभारें अतिलीन ॥ १७ ॥
फेडूं ऋण त्याचें । मी कैचें? । जन्मशत न पुरण्याचें !॥ १८ ॥

× × ×

हे तिळ पाहून । हदरून । तिळतिळ हृदय पिचून ॥ १९ ॥
किति तुकडे होती । काकुळती । पंचप्राणहि येती ॥ २० ॥
नदिचे हें पाणीं । मज आणी । खळखळ डोळा पाणी !॥ २१ ॥
पाणी तेंच भलें । मज रुचलें । त्यांताचे तिळतिळ तुटलें ॥ २२ ॥
हें माझें हृदय । स्नेहमय । मिळविन साधूं कार्य ! ॥ २३ ॥

---

## २० आजचा दसरा !

[ ठिकठिकाणीं दसऱ्याचे दिवशीं शिलंगणाची मिरवणुक निघतेंच. मनुष्याचें स्वाभाविक उत्सवप्रियत्व जितकें जोरकस असेल तितका जास्त तो तसल्या मिरवणूकींत अभिमानशून्यत्वा मुळें भाग घेऊं शकतो. स्वाभिमान जागा झाला तरच खालील प्रमाणें दुःस्थिति होऊन जाते. ]

**श्लोक**—( **वृत्त**–मंदाक्रांता. )

कंठा ! कां रे, गहिंवर तुला ये असा आज जोरें ?
डोळयानों ! कां ढळढळ अशीं आंसवें ढाळितां रे ?
चित्ता ! लागे तळमळ तुला कां ? महा मंगलाचा,—
हा सोन्याचा दिवस दसरा कां तुला ना सुखाचा ?
वेड्या चित्ता ! बघ तरि कसे मंगल स्नात लोक
पोषाखानें मिरविति पथीं ! मोद त्यांचा विलोक.
त्या मोदाची तुजवर पडे छाप कां ती न आज ?
उत्साहाचा दिवस असतां वाटते केविं लाज ?

" साडेतीनां "तिल शुभ महा आजचा हा मुहूर्त
आतां दुःखीं रमशिल तरी जन्मही जाय त्यांत ! "
या वाक्यें हीं तुज नच कसा आवरे शोकपूर
ह्या वेड्याची करिल समजी कोणता ज्ञान--शूर ?
मिष्टान्नाची चव न रिझवी कां तुला स्वादपूर्ण ?
कां तांबूलें न तव वदनीं येत लाली खुलून ?
गंधाढ्यें हीं सुखविति तुला कां न तेलें मना रे ?
कंठी, पोंची, तनुवर नको; तुच्छ झालेंच सारें !
चित्ता ! वेडें तुजसम खरें तूंच, हें स्पष्ट जाण
आतां लोकीं करितिल कमी रे म्हणायास कोण ?
कीं अन्यांनीं विभव लुटिलें आपलें तें स्मरून
आतां दुःखीं झुरसि, सुख जें प्राप्त तें नादरून !

\+ \+ \+

पाहूं आतां पुनरपि महाराज[1] कां लाभतील
त्यांची कृष्णा[2] ठुमकत कधीं चालतां कां दिसेल ?
ती कल्याणी समरचपला श्रीभवानी[3] जयंती
देखावी रे पुनरपि कधीं कोणत्या भाग्यवंतीं ?
दिग्भागांशीं **जरिपटं**[4] कधीं खेळतांना दिसेल ?
**झेंडा** डौलें डुलत **भगवा** काय पाहूं मिळेल ?
स्वातंत्र्याचा पुनरपि मिळे ऐकण्या काय डंका ?
सोन्यासाठीं निज जन शिवे लंघण्या चालती कां ?
केव्हां स्वारी पुनरपि निघे शींव लंघून सर्व
जिंकूं म्लेंच्छ, प्रबल विजय--श्री वरूं हीनगर्व !

१ शिवाजी महाराज. २ त्यांची आवडती काळी घोडी. ३ तरवार. ४ जरिपटका.

दीना राखूं, खलजन वधूं, धर्महीं जागवाया
उद्धाराया स्वजन, परक्या हद्दपारी कराया!
तानाजीशीं करित पुढले बेत हांसून गालीं
येसाजीला ' सुयश कमवा ' ही वदे एक बोली—
" बाजी, गाजी खचित ठरवा आपणा आज लोकीं "
पूर्ण प्रेमें सहज सगळी तोंच सेना विलोकी!
" दृष्टिक्षेपें मज मम धनी धन्य केव्हां करील?
किंवा कोठें मज मनसुब्या कारणें पाठवील?
कोण्या मार्गें वश तरि करूं चित्त याचें शकेन?"
सैन्या मध्यें किति जन असें होति शंकाविलीन!

× × ×

स्वातंत्र्याचें कुतुक तसलें दाविता काळ गेला
हा दास्याचा कटुतम तुझ्या काळ आला कपाळा!
चित्ता! दास्यें तव मति फिरे, शुद्धि गेली उडून
पाचोळा ही निज—जन—करीं देसि सोनें ह्मणून!
ही दास्याची वद तरि कधीं शींव तूं लंघणार!
सोनें सोन्यास्तव—नच तृणें--तूं कधीं वाटणार.
स्वातंत्र्याचा तव वद कधीं चौघडा वाजणार.
तो सोन्याचा दिन तुज कधीं भारता, लाभणार ॥ १२ ॥

## २१ खरें पाणी.

[ ध्रुव. उपमन्यु. रोहिदास या सारख्यांच्या चारित्रांत दिसून येणाऱ्या खऱ्या पाण्याचीं लक्षणें अल्पबुद्धिस पटतीं तशीं खालीं ग्रथित केलीं आहेत. ]

### अभंग.

खरें जातीचे जें पाणी । तें न साहे मानहानि ॥ ध्रु० ॥
वरे आलें सहसा मरण । उणें बोलणें साहे न ! ॥ १ ॥
विकट पुरुषार्थाची वाट । तीहि पायीं घाली धीट ॥ २ ॥
माया मोहीं गुंते ना तें । लेखि ना वा नातें गोतें ॥ ३ ॥
भीडभीतीचा विटाळ । मना नोहे तिन्ही काळ ॥ ४ ॥
हवें तेथें तें पोंचतें । जगा टाकून मागुतें ॥ ५ ॥
भाव देवापायीं अढळ । खूण त्याची ही ढोबळ ॥ ६ ॥

---

## २२ कां ह्मणून आह्मी गुलाम ?

[ जिच्या हातीं पाळण्याची दोरी तीच देशाला उद्धरी—हा जिचा अधिकार त्याच मातृ-देवीच्या तोंडून स्वतःच्याच मुलाविषयीं प्रेमातिशयानें बोलतांना देखील अमंगल 'गुलाम' हा शद्ब वापरला जावा हा परिणाम कशाचा ? चिरकाल अंगवळणीं पडलेल्या गुलामगिरीचा तर नसेल ? ]

**पद.** [ चाल—जरि नाहिं कमल तें करीं. ]

तिनसांज चालली होत । दिव्या धरि जोत । जिवा जणुं काया ।
संचिता तमा उजळाया ! ॥ १ ॥
निज सांजवात सजवून । तिला दावून । तुळशिच्या जवळीं ।
माइनें ठेविली दिवली ॥ २ ॥
इवल्याशा कोनाड्यांत । थिटया देहांत । जीवशी दिवटी ।
वायुशीं करी गुजगोष्टी ! ॥ ३ ॥
तों नभीं एकमेकींत । करित संकेत । थव्यांनीं फिरती ।
तारका हंसत खुणवीती ! ॥ ४ ॥

पटतांच खूण बघतात । मृत्युलोकांत । तोंच त्या दिसली ।
जणुं ममतामूर्तिच खालीं ! ॥ ५ ॥

दारांत उभी राहून । कडे बसवून । आपुल्या बाळा ।
बहुपरी समजवी त्याला ॥ ६ ॥

" हा बघ ले लागू, मोल! चिमीचें पोल ! कावला, कोंबा !
ही बघ ले आली हंबा ! ॥ ७ ॥

ही मङम तुज बायको । हवी का नको? । बघ तुला हंसते ।
'कां नौला ललतो'? पुसते ॥ ८ ॥

घे चेंदू हा लंगित ! । बैथ खेलत । भिंगली, भोला !
गलगला फिले तलि कथला ! ॥ ९ ॥

बग चांदू मामा वली । केव्हला तली ! उगवला बाई !
ललुं नको, उगा तूं ल्हाई ! ॥ १० ॥

तूं उगा न का होणाल? किती ललनाल? थांब हो हांक
बागुलास मालिन देख ! ॥ ११ ॥

" ये बागुलबाबा ये ले ! बाल हा घे ले ! घाल झोलींत
ने दूल तुझ्या खोलींत ! ॥ १२ ॥

अगबाई बागुल आला ! अलेबाप् क्यन्हला ! थांब ले बाल
झोलीत तुला घेईल ! ॥ १३ ॥

नको बागुल येऊं थांब । अले ! जा लांब । शाहणा लाजा !
बघ ललतो तालि का माझा !" ॥ १४ ॥

× × ×

हे हावभाव दावून । पदर घालून । बाळ ती झांकी
तरि मुळीं न थांबे तो कीं ! ॥ १५ ॥

"जल खाऊ कोणा हवा । लले थांबवा! हसा लें हंसला!
गुणि बाळ लालका कथला!" ॥ १६ ॥
हें म्हणत माय दे पेढा । व्यर्थ बापुडा । बाल घे फेंकी!
सदुपाय सर्व थकले कीं! ॥ १७ ॥
तरि उगा ठरेना लेश । तोडितो केश । माय मग रुसली
उसनेंच; ठेवि त्या खालीं! ॥ १८ ॥
त्याकडे पाठ फिरवून । मुकी होऊन । माय ती बसली
बसली पण तत्क्षण फसली! ॥ १९ ॥
आइचें वळण वळवून । तोंड फिरवून । बाळही बसला
बसतांच थांबला हंसला! ॥ २० ॥

× × ×

कीं समोर दिसला तात । पुडा हातांत । उभा शेजारीं
आपला सदा कैवारी! ॥ २१ ॥
खाऊस बाळ बिलगून । उभा राहून । उताविळ होत ।
वर करीं; तसा घे तात। ॥ २२ ॥
उचलून उरीं कवळून । चुंबचुंबून । गुलाबी गालीं ।
पी अमृत तृप्ति ना झाली! ॥ २३ ॥

× × ×

"जो मघां रडे भलताच । बाळ आतांच । राहिला सहसा
इतक्यांताचि बाई कैसा?" ॥ २४ ॥
ती असें नवल बहुवार । करित बेजार । हरखली पोटीं ।
गहिवरें गळां हो दाटी! ॥ २५ ॥
"तो धन्य बाइ ग कोण? पुण्य वेंचून । बाळ समजावी!
चुटकींत साच त्या हंसवी! ॥ २६ ॥

शतवार त्यास वंदीन! पाय पूजीन! ” अशा कुतुकानें
वळविली मान आईनें! ॥ २७॥
तों पहात ज्याची वाट । मधां दारांत । उभी ती होती ।
तो देवचि दिसला पुढतीं! ॥ २८ ॥
लाजून चूर सुंदरी । पदर सांवरी । वांकवी मान ।
लागली बघूं चोरून! ॥ २९ ॥
परतलीं तिघेंही घरीं । उभयतां करीं । आपला हात
एकेक बाळ दे हंसत! ॥ ३० ॥
स्मितमुखी नाथ–मुख–कमल । विलोकित लोल । तरी पण बालीं
धरि मुद्रा करडी काळी! ॥ ३१ ॥
आइचा रोष पाहून । तोंड लपवून । तात–वस्त्रांत
खदखदां बाळ तो हंसत ॥ ३२ ॥
गेलीच सती हिरमुसुन । वदे पण हंसुन । “द्वाड मुलखाचा!
छळवाद मांडि दुसऱ्याचा! ॥ ३३ ॥
हा पदर इकडचा धरुन । हंसे खदखदुन । हिणवितो मजला
किति **गुलाम** तरि गे झाला!”॥ ३४ ॥
तों पान्हा तिज दाटून । जवळ जाऊन । उचलण्या सजली
तों बाळ-वाणी कडकडली! ॥ ३५ ॥
“नको जाऊं अम्हांला धालित। अशी तूं उगित । दूल जा दूल
जल मुल्काचा मी द्वाल! ॥ ३६ ॥
कां ह्मणून आम्हि **गुलाम**? काय ग काम? अथें बोलावें?
मग कुणी तुजपशीं यावें? ॥ ३७ ॥
मी मुलींच ना येनाल? बला मी दूल । अथा बतनाल
या आमत्या दादाजवल!” ॥ ३८ ॥
× × ×

मातेनेंच मुला 'गुलाम' वदणें दुर्दैव हें केवढें?
ही जाणीव खरीच अल्लड मुला त्या हो असें मानणें
नाहीं योग्य परिस्थितीस बघतां हें सत्य आहे तरी
धिक्कारून न चालणार चमके जें तेज वेळेवरी!
आईच्या इतकी मुला प्रिय जगीं कालत्रयीं आइच!
तीही त्याज्य अशीच तो शिशु गणी, तीं बोलतां दुर्वच!
स्वातंत्र्योन्मुख भारतीं जननि नो! पुत्रांस संबोधितां
केंव्हांही दुखवा न, आज दुणवा उत्साह, तेजस्विता!

---

## २३ बोला फुलाशीं गांठ!

[ परिणामाकडे नजर न देतां तोंडाला येईल तसें बोलणें कित्येक वेळां मोठें जाचक ठरतें. निदान लहान मुलाबाळाशीं बोलतांना तरी जाणत्या माणसांनीं अशा गोष्टींत अवश्य सावधगिरी ठेवली पाहिजे. ]

" आई जाशि कुठे? कडेवर मला घे, येऊं दे संगत."
लाडें आडवि बाळ आइस कुणी वाटेंत हें बोलत
कार्यव्यापृत गेहिनिस कसली ही आडकांठी रुचे?
कोपें कांहिं तरीच त्यास वदली आलें मुखा जें तिचे!
भाषेचा परिणाम लेशहि तिनें लक्षांत ना घेतला
तें तों अर्भक! त्या कळेल कसला गूढार्थ बोलींतला?
'जातें मी मसणांत' माय वदली तों बाळही बोलला
'येतों मीहि तिथें'च!—तोंच चटका आईस त्या लागला!
" छे छे! बाळ, मुखीं अमंगल असें केंव्हाहि बोलूं नये"
हें ती सांगत तों तिची तिज चुकी संपूर्ण लक्षांत ये.

तीं चावे जिभ आपली; समजवी बाळा कडे घे सती
बाळेच्छा पण काळ--कर्ण--विवरीं गेलीच हो, हाय ती!
× × ×
गेला बाळ, उजाड गेह पडलें, आई रिकामी फिरे
"येतें मी मसणांत, बाळ! मज ने," वेडी अशी हंबरे!

---

## २४ ताईची गंमत!

[ लहान मुलांची आवलेपणाची समजूत बदलण्याचें सामर्थ्य परिस्थितींत कित्येक वेळां दिसून येत नाहीं. ]

**श्लोक. [ वृत्त—शार्दू० वि० ]**

" मी येणार न जा तुझ्याजवळ! हें ताई पुलें ओल्हने!
आई लोज खुली म्हणे तुज नसे, खोटें तिचें बोलणें.
' गट्टी फूः ' कळितांच गंमत तुझी थांगून साऱ्या जनां
आतां आलिस तूं तली तुज कुणी खेलांत घेणाल ना!
लोकांच्या जिनसास हात न कधीं बाळा बलें लावनें
ताई! सांगत तूंच ना मज अशें होतीस मोठ्यापणें?
तें सालें विथलून तूंच उलतें हें काय आलंभिलें?
बाबानीं न दिले कुथून मग हे तूं दागिने आणिले?
नाहीं ओळखदेख कालचि कुथें आले इथे पाहुने
त्यापाशीं बथलीस लाजत कथी ' नौला ' तुजा ते म्हणे!
त्यानीं घांस दिला कसा पण खुळे, केलास ' आ'लौकल
लोकांच्याच पुल्ह्यांत काल बतली होतीस घोरयावल!"
× × ×
" लोकांचीच इथून ती, नच तुझी ताई, खुळ्या माणसा!"
कोणीसें म्हणतांच बाळ बिलगूं ताईस गेला तसा!

---

# २५ ये सोने इकडे.

( दोनच महिन्यापूर्वीं ताई लग्न होऊन सासरी गेली त्यावेळीं दोन वर्षांच्या सोनीनें तिला आपल्या हातें कुंकू लावलें होतें. आज तीच ताई घरीं परतली तिला सोनी मुळीच ओळखेना ! ]

श्लोक. [ वृत्त–शार्दू० वि० ]

"ये, सोने ! इकडे–भितेस इतकी पोरी, मला कां बरें ?"
"माझी ताइ नव्हे कुनी तलि तुमी लोकें अहां ना खलें ?"
"छे छे ! बाळ तुझी खरोखराचि मी ताई, न कां ओळखे ?"
"हें कांहीं तलि सांगता ! फथविता कां हो खुल्यासालखे ? "
"बाळाला फसवून काय मिळतें आहे मला सांग ना ?
लोकांची असतेंच मी तर कसा येता मधू शाहणा ?"
"त्याला खाऊ दिला अथाल;"–"मग मी देऊं हवा कां तुला ?"
"लोकांचा पण खाऊ तो मज नको–देईल आई मला !"
"खोटें बोलत मी असेन पण कां आई हि बोले तशी ?"
सोने, ऐक तिचें तरी–मजकडे 'जा' ती ह्मणे; 'ये अशीं' !
"बाबांना पुसणार होय तिकडे जाऊन तूं सत्वर ?"
तों मुग्धा निरखीत ती स्वभगिनीभाला पळे आतुर !

* * *

नेत्रक्षेप तिचा न तो सविष कीं भाला उराला जसा
ताईला निज कुंकुमास्तदिन[१] तो दावी जशाचा तसा !

---

१ कपाळींचें कुंकू पुसल्याचा दिवस.

## २६ घे घे नांव !

[ मुलांबाळांनीं भरलेल्या घरीं अशा तऱ्हेच्या आडवणूकीचे प्रकार चालतातच. ]

[ वृत्तः—शार्दूल वि. ]

"घे घे नांव तरीच आज सुटका होईल काकू तुझी"
"हा रे आग्रह बाळ काय भलता ? येतील ना भावजी ?
येथें आडविलीस तूं मज असें दृष्टीस त्यांच्या पडे
आहे माहित ना विचार पुढचा कोण्याप्रकारें घडे ?"
"काकू, तें पण कोणसें उतरतें आहे पहा खालतीं !
आता जाशिल तूं कशी वर ? करी बंदी तुला कोण ती ?"
"बाळ्या, कां झगडा जिन्यांतचि जुपे"—"काका पहाहो कशी
काकू नांव न घेत ही झगडते ! वाया दटावी मशीं !"
"वेड्या, वाट तिची धरून भलत्या वेळीं जमावें कसें ?
माझें नांव तुझ्यासमोर सहजीं घेणार ती कां असे ?
तान्हा तूं असतास बाळ पडला त्या पाळण्याभीतरीं
ठेवूं नांव तुझें उदंड जमल्या शेजारणी या घरीं
त्यांचा आग्रह मात्र ही पुरविती; हा काय आह्मां बधे ?"
"बाळ्याचा नच खेळ हा इकडचा एकूण" ! तों ती वदे !

---

## २७ तथास्तु !

[ वृत्तः—शार्दूल वि. ]

"मातीची सहजी फुटेल असली नाजूक ही घागर
माथां वाहसि राधिके ! जप बरें येईल दामोदर !

तो केंव्हांच तुला कळे न इतक्यामध्यें खडा मारिल
हांका मारित राहशील मग हें जाणून आधीं चल ! ”
कोणी यापरि गोप भाविकपणें राधाहितैषी वदे
त्यानें सावध लेश ती न, उलटी निष्काळजी हो मुदें !
बोले विस्मित वृद्ध तो “ हित रुचे कोणा कधीं या वयीं ? ”
हांसे त्यावर अर्थपूर्ण नयनें पाहून ती निर्भयी !
तों मागून खडा अचूक सहसा त्या घागरीला भिडे
दुग्धस्नान सचैल तत्क्षण तिला तें आयतें हो, घडे !
ती मागें वळवून मान बघते तो कोण आहे तिथें ?
हास्याचा ध्वनि चोरटा पण उठे कुंजांत एकीकडे !

× × ×

वृद्धाला निज वाक्य--सिद्धि सुखवी, डोळांत हांसे तिला
त्याला तुच्छ करून तोंच शिरली कुंजीं मुदें चंचला !

---

## २८ सासुरवास.

### ( दृश्य १ लें. )

[ स्वदेशाला स्वातंत्र्य लाभावें ह्मणून जनता एकिकडे धडपडते आहे तों दुसरीकडे—नव्हे घरच्या घरींच—आपल्याच रक्तामासाचीं माणसासारखीं माणसें सासुरवासाला कंटाळून आडा—विहिरींचे तळ गांठताहेत याला ह्मणावें जग ! ]

श्लोक. ( वृत्त--शा. वि. )

“ बालंटें रचिलींत कल्पकपणें कित्येक माझ्यावर
खोट्याचें हि खरें करून शकलां दावूं प्रतिज्ञेवर !

पैशांची उधळून धूळ नयनीं केलें जगा आंधळें
न्यायाचा तुमच्या कडेच झुकवूं कांटा तुह्मां साधलें !
बुद्धि, द्रव्य, मनुष्य, तीन परिचीं संग्राह्य लोकीं बळें
सारींही मज एकटीवर तुह्मीं तीं वेंचिलीं हो भलें !
या एका दुबळीस वारण करूं हीं एवढीं साधनें ?
देवानें नच मीच अंत तुमचा हा पाहिला धिक् जिणें !

× × ×

वन्सें, कष्ट पुरेत, बुद्धि तिरकी आतां नका चालवूं;
सासूबाइ, न द्या हरीविण दुजें आतां जिभेला शिवूं
मामाजी ! कलत्या मुठी नच तुह्मां दावूं पडे यापुढें
नाथा, लग्न करा खुशाल दुसरें माझ्यामुळें जें नडे
माझे आपण सर्व, मीहि तुमची,—व्हावी क्षमा यास्तव
येतें "—ती वदली न तोंच उठला आडांत मोठा रव !

---

## २९ सासुरवास. ( २ रें दृश्य. )

श्लोक. [ वृत्त—शा. वि. ]

नष्ट प्रायाचि शुद्ध पक्ष झिजका[1] टेंकीस आला पुरा
शय्येला खिळला उदार मतिचा ग्लानीमधें सासरा
आक्रंदून बराच वेळ थकला थांबे निशा-कीटक
सासूच्या टकलीस खंड पडला वांसून झोंपें मुख !
थूत्कारा क्षणमात्र थूक पडलें सोडून ढोलीमधें
चिंता-व्यग्र नणंद ती निजसुरी लोळे बिछान्यामधें.

---

[1] चांदण्याचे दिवस; पक्षीं सत्पक्ष.

जावा कीं वटवाघुळा चिकटल्या आपापल्या आसऱ्या
दीरा घेरिच झांप गाढ तसली वाऱ्यासही धांवऱ्या !
काळोखा अधिकाधिक प्रतिनिशें तो चंद्र झाला वश
रंगे दुर्जन संगतींत पतिही नेणें सुधा वा विष !

× × ×

" आतां बेचव जीवितास जगतीं कां मी खुळी लांववूं?
ही आली अनुकूल वेळ असली वांया कशी घालवूं ? "

× × ×

आकाशांतिल चांदणी निखळली तों सून सोडी घर,
नादावून भयाण आड उसळे पाणी क्षणीं ज्यावर !

---

## ३० सिंहगड चढून गेल्यावर !

[ जिज्ञासु इतिहासप्रिय माणसाला सिंहगडावर जातांच जी प्रश्न-परंपरा आपोआप एकामागून एक पडते त्याचें चित्र खालीं काढण्याचा यत्न केला आहे. ]

**श्लोक. [ वृत्त—शा. वि. ]**

कोठें त्या यशवंतिची दरड ही नेटें धरी ती जिला?
कर्तव्यीं दृढभाव सोल नच तो कोठून हो लोंबला?
स्वर्गा मार्गपरंपरा रचविली कोठून **तानाजिनें** ?
जी साधे चढण्यास, त्यासचि दिलें देशार्थ ज्यानें जिणें!
सत्तामत्त–गजेंद्र[१]–कुंभ पिचवूं तो सिंह कोठें उडे ?
कोठें तो उदयार्क[२] अस्त सहसा पावे मराठ्यापुढें ?

---

१ सत्तेच्या मदानें माजलेला मोगल सरदाररूपी हत्ती त्याचे गंड-स्थळ. २ उदयभानु.

संग्रामातिशयें[1] नृसिंह[2] थकला घायाळ कोठें पडे ?
भीतीची क्षणमात्र ती अवदसा कोठें मराठ्या भिडे ?
अत्यंतोज्वल सूर्य[3] तोंच हरिसा कोठे करी गर्जना ?
कोठें ती मृत-बोधिनी[4] पढविली उत्साह–गीता जना ?
कल्याणाभिध मुक्तिचें रणहतां तें दार हो कोणतें ?
कोठें म्लेंच्छ हटून सद्यश मिळे अंतीं मराठ्यांस तें ?

× × ×

तें तें स्थान बघे तिथें शिर लवे,–तों होय कष्टी मन
कोठें पूर्वज धन्य ! आपण कुठें ! त्यां मुक्ति, या बंधन !

---

# ३१ गेला कालचि राम !

[ मि. कै. रामचंद्र पांडुरंग मुसरीफ आजारी पडून मिरजेस हवा पालटण्यासाठीं आले असतां एकाएकीं पुण्यास परत निघून गेले. त्यांची चौकशी करण्याकरितां मी घरीं गेलों तों त्यांच्या वडिलानीं सांगितलें " राम कालच गेला " ! पुढें आठच दिवस गेले तों एका पहाटेस हेच गृहस्थ पुण्याच्या गाडींतून उतरतांना मला दिसले. मी पुन्हां विचारलें " राम कसा काय आहे ? " त्यांनीं उत्तर दिलें " राम कालच गेला " पहिल्या वेळच्या उत्तरांत दुसऱ्या वेळचा गद्गद कंपित स्वर नव्हता ! ]

## श्लोक. [ वृत्त—शा. वि. ]

' गेला कालचि राम, ' आठ दिवसामागें तुह्मीं बोलला
कांहीं जाणवलें तुह्मां न वदतां, वा ऐकतां तें मला !

---

१ फार लढण्यामुळें. २ पुरुषांतला सिंह. ३ सूर्याजी. ४ मेलेल्यांनाही जागे करणारी.

आतां तीच किती परंतु दुखवी दोघांहि शल्यावली
कीं तो राम फिरून पाहिन अशी आशाच नाशावली !
आजारी असतांहि राम परते तो कां पुण्याला बरे ?
त्याला चैन घरींहि कां न पडलें ? कां तो मनाशीं झुरे ?
याचें चिंतन मी करीं मजसि तों भेसूर कांहीं दिसे–
देखावा; स्मृति आजही मजसि ती गांजून लावी पिसें !

× × ×

हिंदुस्थान न जीर्ण हें वन जिथें दुष्काळ राजा असे
जीवांचा झगडा जुपे सतत कीं ' कोणी जगावें कसें ' ?
पोटाची खळगी न, ही भडकली ज्वालामुखी ! जी करी–
स्वाहा ऐन नवी पिढीच दुबळी जी सर्वथा किंकरी !

× × ×

दैन्याच्या चरक्यांत जीव चिरडे बेकार कंटाळला
काळा आळवि राम; तो सदय त्या भक्ता त्वरें पावला !

---

## ३२ निराशा.

[ तीन तीन तास जिवापाड खपून देखील जेथें पिण्यापुरतेंही पाणी मिळण्याची मुष्किल असते त्यांनाच ही ' निराशा ' चांगली कळून येईल.]

**श्लोक.** ( **वृत्त**—शा. वि. )

भोकें बोळवलीं तरी जल गळे जींतून अंगावर
माथीं घागर ती धरून गृहिणी चाले कुणी सत्वर !
डोकावी गगनांत तों दचकली, बोले " अगाई किती—
या पाण्यास्तव वेळ आज सरला ? आतां कशी हो गति

जागा बाळ असेल झोंप पुरती घेऊन झाला घरीं
तो सारें घर ना चुकेल रडतां घेण्यास डोक्यावरी !
बाहेरून असेल खास घडलें केंव्हांच येणें घरीं
माझी चूल बघून थंड चुकती आठ्या न दाटूं शिरीं !
बाळाचें तितक्यांत खोल रडणें येईल कानीं जर
डोळ्यांतून फुलून विस्तव जसा लागेल सांडूं तर ! "
बोलूं मी न शकेन कांहिं; तिकडे दुर्वास अंगीं शिरू-
लागे वेळ न ! बापडी मग तिथें मी काय बाई करूं ?

\+ + +

चिंताविष्ट अशी घरा-निकट ये तों कोसळे भूवरीं
उन्मत्तें शकटासुरें ढकलली जो धांवतां ' पोम् ' करी !

---

# ३३ माझी हांव.

## छंद—दिंडी.

पर्वताग्रीं टुमदार झोपडींत । कंद मूलांनीं भूक भागवीत
शुद्ध पाणी स्फटिक विमल पीत । रामभजनीं रंगून काल नेत ॥
बाल हरिणांची मौज विलोकीत । त्यांस गोंजारित गोड घांस देत ।
पांखरांचे मुग्ध मधुर गीत । नव्हे कानीं ती खचित सुधा पीत
लहर लागे तों मुक्तकंठ गात । तसें अलगुजही कधीं वाजवीत
समाधीच्या सौख्यास अनुभवीत । सुखा दुःखा देहाहि विस्मरीत
निजात्म्याला विश्वात्मतेस देत । वस्तुमात्रीं आपणा ओळखीत
कधीं राहिन कां हीच नित्य हांव । भक्तवत्सल तरि करो पूर्ण देव !

---

# ३४ प्रियस्मारक.

[ खालील प्रमाणें प्रियास्मारक करण्याची ज्यांना कधीं पाळी येत नाहीं तेच धन्य होत. ]

**श्लोक [ वृत्त—शार्दु० वि. ]**

येतां इंद्रधनुष्य रम्यतम तें शोभा नभा दे क्षण
वेधी मार्मिकचित्त तेविं कुतुकें आबालवृद्धेक्षण[1] !
त्यांची दर्शन--लालसा न पुरते तों तें लपे तत्क्षण
कीं सत्य क्षणभंगुरत्व रमणीयांचें महालक्षण !
मूर्त प्रीति उषा सुधारसघटी[2] आरक्तशोभामय[3]
येथें जों क्षितिजीं क्षणीं करितसे विश्वा प्रमोदालय[4]
घाले दर्शन–लोलुपेक्षण[5] न जों तों ती लपे तत्क्षण
कीं सत्य क्षणभंगुरत्व रमणीयांचें महालक्षण !
बालादित्य[6] करें मनोरम निभा[7] अत्यंत जे दाविती
सुज्ञाही हिमबिंदु[8] जे भ्रमविती मुक्ताकृतीनें[9] किती ?
धांती[10] कौतुक लोलदृष्टि नच तों ते लोपती तत्क्षण
कीं सत्य क्षणभंगुरत्व रमणीयांचें महालक्षण !

**[वसंत तिलका.]** अत्यंत रम्य तितकी अचिरायु वस्तु
हा मुख्य विश्वनियमांतिल गूढ हेतु
याचें चिरस्मरण हेंच मम प्रियेचें
सुस्मारक प्रकट मी गणितों सतीचें !

---

१ थोरापासून लहानापर्यंत सर्वांचे डोळे. २ अमृताची घागर. ३ लाल शोभेची. ४ आनंदाचें घर, माहेर. ५ अत्युत्कंठित डोळे. ६ सकाळचा सूर्य. ७ तेज. ८ दंवाचें थेंब. ९ मोत्यांच्या आकारानें. १० संतुष्ट होतात.

[ मालिनी. ] विपुल गुणधनाची मंजुषा मत्प्रिया ती
निशिदिन अतिलोभी मी तिला एक चिंती
अवचित तिज चोरी काल तेणें कृतार्थ
कृपण विरहि मी " हा हा "? करी स्मारकार्थ ?

---

## ३५ योगायोग.

[ नुकतेंच वेलीवर उमललेलें एक फूल वाऱ्याच्या धक्क्यानें देंठापासून निखळून बराच वेळ हवेंत तरंगत राहिलें व अखेर एका शिवालयाच्या शिखरावर पडलें ! ]

**श्लोक.** [ वृत्त—वियोगिनी. ]

अजि हाय दया न ये तुला । कटु दैवा ! अणुमात्रही कशी ?
क्षणही जननी[1] करीं न घे । मज तों तूं हिसकून चालशी ! ॥१॥
कुतुकें मज खेळवो क्षण । जननीही; मज ओढ ना असें
सुतमातृवियोग[2] साधणें । हितकारी वद कां कुणा असे ? ॥ २ ॥
अपराध तिनें न मीहि वा । तव केला स्मरतें कधीं मला
मग कां छळतोस वावगें? । अथवा कोण छळी न दुर्बला? ॥३॥
परतून पहा जननी कशी । मजवांचून हताश होय ती !
पळ हें सरतांच वाटतें । मरणाला वरणार निश्चिति[3] ! ॥ ४ ॥
बलमत्त[4] समीररूप तूं । मज दीना न विधे[5] ! छळी असें
बल दुर्बल—पालनार्थ कीं । परपीडार्थ न देव देतसे ! ॥ ५ ॥
उडवीत मला असें तसें । पवना ! त्वां किति दूर आणिलें ?
इतक्यांतचि हाय हायरे ! । मम माता—मुख केविं लोपलें ? ॥६॥

---

१ आई. २ आई आणि मुलग्याची ताटातूट. ३ निश्चय.
४ बळानें माजलेल्या वाऱ्याचें रूप घेतलेला. ५ दैवा.

लपलीं सहसा वनस्थलें । लपलीं हाय फुलें सहोदरें[1]
हृदयीं अतिवेग दाटला । ममतेचा मम पूर पाझरे ॥ ७ ॥

असतील सुखांत काय तीं । मजवांचून अजून खेळत ?
कुसुमें जगतांत मानिली । मृदुता मूर्तिमतीच संतत ! ॥ ८ ॥

गिरिनिर्झर गोड एकदां । परिसूं दे तव गति मंगल
स्फुरवी नवजीवना हृदीं । विधिला मी ठरवीन दुर्बल ! ॥ ९ ॥

असतील कुठें रसज्ञ ते ? । करिती काय वरें मधुव्रत ?
निजबंधु विमोचनाविणें । सुचलें त्यांस कसें दुजें व्रत ? ॥ १० ॥

मम आर्तवचांसि आयका । मधुपानों ! परता त्वरा करा
असहाय सखा पडे महा- । व्यसनीं हा तुमचाच घा करां ! ॥ ११ ॥

अतिमुक्त करूं दिलें तुह्मां । मधुपाना मम बंधुंनीं सदा
समयींच कृतज्ञता तरी । प्रकटूं द्या तुमची हितप्रदा ! ॥ १२ ॥

अथवा बरवें सुदूर व्हा । नच या येथ, पडाल संकटीं !
भिडले मज कृष्ण मेघ हे । भय वाटे हिम बाधते किती ! ॥ १३ ॥

अति कर्कश घोर गर्जना । करितो हा भिववी मला घन
किति नाचवि कोलितें करीं । जळतें अंग गमून भी मन ! ॥ १४ ॥

तनु ही करपून पाकळ्या । गळतील क्षणही न जाय जों
सरलें मम आयु पार तें । मजला मृत्यु पळींच या भजो ! ॥ १५ ॥

पडलें पडलेंच हाय हा ! । बुडलें मी जलधी-जलांतरीं
चढल्या लहरी नभांत या । पण नाहीं ! मज वायु तों हरी ! १६

---

१ बरोबर जन्मलेलीं. २ भोंगे; पक्षी गोडी घेणें हाच ज्याचा धर्म आहे ते. ३ धांवा. ४ अनाथ. ५ यथेष्टपणें.

जवनें पवनें फिरून या । गमनीं उंच हरून आणिलें
रविचे कर भाजती मला । गमतें मृत्युमुखांत ओपिलें! ॥ १७ ॥
वळवी लहरी अधोमुख । पण वायू इतक्यांत त्यामुळें
रविचे कर दूर राहिले । मज शांति क्षणमात्र तों मिळे! ॥ १८ ॥
इकडे तिकडे तरंगता । धरणीसंनिध पोंचलें जसें
क्षणमात्र मनास वाटलें । "जननी दुर्लभदर्शना नसे"[1]! ॥ १९ ॥
पण छे: प्रणयी जनें कुणीं । मज दूरून तदा विलोकिलें
अतिहर्षित चित्त धांवला । मजला हस्तपुटीं धरूं बळें ! ॥ २० ॥
रचली रमणीस भूपवूं । सुममाला युवकें मनोहर
तिज सुंदर गुच्छ गुंफण्या । मज वेंचूं सजलाच सादर! ॥ २१ ॥
दल एक मदीय तत्करीं । गवसे तों लहरीं दुणावली
पवनें नयनांत धूळ त्या । युवकाच्या इतक्यांत घातली! ॥ २२ ॥
दल एकचि तत्करीं ठरे । सहसा जें पवनें दगावलें
गगनीं फिरण्यास बाकिचें । वपु[2] माझें परतून लागलें ! ॥ २३ ॥
उडतां उडतां अहो फळे । सहसा संचित पुण्य तों मम
श्रमविक्लव[3] दीन मत्तनू । शिवलिंगार्पण होय उत्तम ! ॥ २४ ॥

जीवास संचित–वशें बहु जन्म येती
दुःखें सुखें विविध संतत त्यास देती
त्यांतूनही प्रभुपदीं मिळणें अखेर
पुण्यांश यास्तव जिवें रचणें जरूर !

---

१ फुलास वाटलें कीं आईचें दर्शन आतां दुर्लभ नाहीं. २ शरीर.
३ श्रमांनीं शिणलेलें.

# ३६ सख्याची भेट !

[ आपल्या 'जातीचा ना गोताचा' अशा सर्वस्वी परक्या, त्यांतल्या त्यांत 'सशस्त्र,' इसमाविषयीं भली बुरी कसलीच शंका न वागवितां त्याच्या हातीं आपलें 'शिर' बेदिक्कत देणाऱ्यांच्या धाडसाची तारीफ अधिक कीं आपल्यावर विश्वासलेल्या सर्वांनाच 'शिरसलामत' ठेवणाऱ्या 'सख्या'ची तारीफ अधिक, हें ज्याचें त्यानेंच ठरवावें. बाकी आत रक्षकांलाच 'सखा' हें नांव शोभतें खरं ! ]

## लावणी. [ चाल—तुझा मुखडा० ]

किति शोधशोधिलें तुला । जीव भागला । पाय भेंडळले
ये चिकटा ओठावरी तोंडही सुकून पुरतें गेलें ! ॥ १ ॥
पोटांत कावळे कोरूं । तेविं कुरकुरूं । लागले देख
परदुःख भल्या रे कधीं न शीतळ स्वार्थिपणें लेख ॥ २ ॥
या उन्हांत हिंडूं किती ? झळा वाधती करपलें अंग
हा निथळे खालीं घाम मुखाला चढला तांबुस रंग ! ॥ ३ ॥
किती ठायीं ठायीं फिरूं ? चौकशी करूं ? किती जणा जवळ !
तुज शोधूं निघता मज किति खोटी लागे ही वेळ ? ॥ ४ ॥
वायदा आठ दिवसांचा । खास भेटीचा । उभयतां केला
किति दिवस पाळिला अचुक आज पण तूं कां टोलविला ? ॥५॥
रविवार आज उगवला । तसा बघ भिडला । तुझ्या वाटेला ।
हा एकसारखा डोळा पळहि न तिथून चाळवला ! ॥ ६ ॥
पण ऐक वाजले दहा ! घड्याळीं पहा ! बसे मज चटका !
कीं भरून गेली आज सख्या तव भेटीची घटका ! ॥ ७ ॥
" इतक्यांत खास येशिल ! नव्हे असशील ? कदाचित् आला ! "
हें म्हणत मनीं मी कितिदां नेला खिडकीशीं डोळा ! ॥ ८ ॥

" फिरफिरून डोकावतां? कुणा पाहतां? " पाहुणा कोणी
येणार आज कां? " मला कौतुकें पुसिलें कित्येकांनीं! ॥ ९ ॥

" मज वदा पाहिलांत कां आमचा सखा तुह्मी तरि कोठें?
मी आहे तिष्ठत त्याच्यासाठीं केव्हांचा येथें! " ॥ १० ॥

हा जात्या येत्या जना। अहो कैकांना। जाब पुसला मी
पण उडत बोलणीं त्यांचीं अवघीं माझ्या ना कामीं! ॥ ११ ॥

नाइलाज होतां असा। मीच त्यासरसा। घरा बाहेर
तुज शोधूं पडलों कीं मेल्याविण स्वर्ग न दिसणार! ॥ १२ ॥

तुजविणें आडलों असे। चैन मज नसे। हें शिर भोंरवलें[1]!
प्रति केसा केसा गणिक भोंवते शत्रु मला जमले! ॥ १३ ॥

अनिवार घे घे मारा। मुखावर सारा। उठविला यांनीं
हा अर्धा मुर्वा[2] गळाहि धरला बघरे कैकांनीं! ॥ १४ ॥

नाकांत टोचती सुया। लव न त्या दया। घांव सोडिव रे!
मम केसां तुजविण धक्का[3] लागतां शोभे काय बरें? ॥ १५ ॥

वळणांत कुटिलें[4] हे तसे। ठाउकें नसे। यांस पांझरणें[5]!
हे स्नेहातुर[6] तरि पुरे डोयिजड होतीं कांहिं दिनें! ॥ १६ ॥

हे कळकट काळे वरी। तसे अंतरीं। एकचि त्यांस हवें
कीं शिरीं दुजांच्या प्रतिष्ठितपणें निशिदिनीं मिरवावें! ॥ १७ ॥

---

१ हजामत वाढली ह्मणजे डोकें जड वाटूं लागते व केस शत्रु वाटूं लागतात. २ दाढीची वाढ अर्ध्या काळ्या पर्यंतही होते. ३ न्हाव्यावांचून केसाला धक्का कोण लावणार? ४ कुरळे. ५ केसानां द्रव नाहीं. ६ तेल खाऊ; पक्षीं स्नेहासाठीं हांपापलेले.

कितिकदां टाकिले खुडून । पार तोडून । तरि पुन्हां उठती!
कच[1]संजीवनिची प्राप्ति गुप्त हो निःसंशय यां ती ! ॥ १८ ॥
" निजधर्म तरी ना सोड । परांशीं झगड । फलाशा धर ना ।
निज कर्तव्या जप " आज्ञा प्रभुची आण सख्या स्वमना !॥१९॥
रे सख्या! धांव लौकरी । हत्यारें करीं । सज्ज घेऊन
नच विलंब बरवा सख्या कारणीं जातां धांवून! ॥ २० ॥
तुज मुभा देत सरकार । मनाचें थोर । खरें मज पटलें
तूं स[2]शस्त्र फिरण्या शकसि कुठेंही कोणत्याहि वेळे! ॥ २१ ॥
तूं सशस्त्र येतांक्षणीं । मोकळ्या मनीं । तुझ्या करकमलीं
ही शिरासहित मी सख्या समजरे मान आपली दिली! ॥२२॥
दुखविलेंस मज तूं दुखीव । तरी हा जीव । फिदा तुजवरती ।
तुज सख्या एकदां म्हटल्या मज तूं करशिल पूर्वचि ती! ॥२३॥
मम शिरीं शो[3]णनद वाहो । लाजला शिव हो । क्षणीं एकाच
कीं गंगाधर तो मीहि तव कृपें तत्स्पर्धी साच! ॥ २४ ॥
निज नखांतली ही माती । कुणा ही नच ती । कधीं मी देत।
तुजसाठीं केवळ असें राखिली तुज घे ही त्वरित! ॥ २५ ॥
ना--उमेद कर ना मला । जीव आडला । काय किती सांगूं!
तव भेट घडेना आज तर कसा उद्यां जगीं वागूं? ॥ २६ ॥

---

१ संजीवनी विद्या मिळवून. कच अमर झाला. कच. याचा दुसरा अर्थ केस असाही आहे. २ हत्याराचा कायदा ज्यास लागूं नाहीं असा न्हावी हाच एक हिंदुस्थानांतला भाग्यवान् प्राणी आहे! ३ शोण ह्मणजे रक्त, त्याची नदी डोक्यावर वाहूं लागली ह्मणजे-शंकराच्या डोक्यावर गंगा आहे तेव्हां त्याच्याशींही स्पर्धा करण्यास हरकत नाहीं! ४ हजामत वाढल्यावर शिष्टाचारांत अलीकडे बिघाड झालासा वाटतो.

मज मिळतां माझे सखे । एकसारखे । हिणवितिल मज कीं
" रे परावलंबी जना फजीती टरलेली लोकीं! ॥ २७ ॥
" जणु पैशाची हो ओढ? उभारूं फंड! काय तुजसाठीं ;
ज्यांतून दोन तुज आणे द्यावे आठवड्याकाठीं!" ॥ २८ ॥
हीं अशीं बोलणीं उणीं सहावीं कुणी? तूंच मज बोल
तुजसवें जोडिल्या मैत्रिस यावा उगाच कां वोल? ॥ २९ ॥
ये धांवत वारा जसा । भेट मज सहसा । अधिक वदवेना
ना पितो भेटतां सुख मज तुजसम, ऐक आज सुजना! ॥ ३० ॥

---

## ३७ मंगलाक्षतांचे दोनच दाणे.

### श्लोक. [ वृत्त—शार्दू० वि० ]

" देशोद्धार करीन " हें व्रत मनीं रे बांध मुंजा मुला!
" अन्याया निवटीन " यास्तव करीं घे दंड हा आजला
" राष्ट्रीं प्रेम करा " अशीच सकलां तूं माग भिक्षावळ
हा साधून मुहूर्त मंगल असा जोडून घे मंगल!
तूं आद्याश्रम पाळ उत्तमपणें, संपाद विद्या भली,
ओजस्वी बल वीर्यवंत पुरता हो; आणि दे आपली—
विद्या बंधु—गणा स्वदेश उजवूं सामर्थ्य आणावया
नाहीं जीवित—कार्य याविण दुजें अत्युच्च वानावया!

---

१ आपली आपणच हजामत करणारांनीं असें दुसऱ्यास दूषण दिलें तर वावगें काय? २ हजामत वाढल्यावर बापाच्या भेटीनें काय फायदा? नापिता ह्मणजे न्हाव्यालाच भेटण्यांत सुख आहे हा भाव. ३ ब्रह्मचर्य. ४ तेजस्वी.

# ३८ शारदश्री !

[ मासिक मनोरंजनाच्या एका अंकांत ‘ शारदश्री ’ नावांचें तक भावगम्य चित्र पाहून ही कविता सुचली. ]

**लावणीची चाल.**

टक अशी एकसारखी । लावि रवि निराखि । कुणा हा बाई ?
हें नवल करित ही नवलाई जणु नागमोड मुंबई !
शिवला न कधीं काजळा । तरी पण डोळा । तिचा किति काळा
भुलवील जितेंद्रिय मी मी म्हणत्या कुणाहि सुज्ञाला !
मुख उभट गोल गोड तें । कमल उमलतें । लालसर, गोरें
नवलांत चूर मन म्हणून खुललें अधिकचि गहिरें मोरें !
स्मित पाडी गालीं खळी । खुलतिं पोंवळीं । हिरे लखलखती
ज्या ओंठ दांत हीं नांवें अरसिक खुळे मात्र देती !
चवथिची चंद्रकोर ती । तशी हनुवटी । जिनें वेडवला
निःशंक पारणा संकष्टीची करूं सजेल भला !
भरगच्च गळां रानटीं । फुलें गोमटीं । गुंफलीं माळा
जणु पीन–पयोदीं[1] लोळाति लाडिक बाळा कीं चपला !
त्या उन्नत भागावरून । चाप सजवून । मारण्या इतरां
जणु दडून वसला मालारूपें गमे पुष्पशर[2] खरा !
उर झांकत इकडे तिकडे । पदर फडफडे । लागतां वारा
ध्वज तळपे जणु तो त्या मदनाचा चित्त चोरणारा !
कटिखालीं गुडघ्याइतकें । बांधलें सुडकें । बाकिची उघडी
पायांत वाहणा उभी सुंदरी शेताच्या दंडी !

---

१ चपला=वीज; पक्षीं दाट ढगामध्यें स्तन; पक्षीं चपळ बालिका ! २ मदन.

जणु दाट घोस मोत्यांचें । भरिव उजळ्याचे । तशी कणसें तीं
धरि डाव्या खांके अन्नपूर्णिका प्रकटे काय सती!
तेजाळ वांकडा विळा । तिखट पाजला । फिरवि रवि–किरणें
जणुं उजव्या हातीं उषांच[1] ती घे चंद्रखंड लेणें!
पुतळीच समाधानाची । वाटली साची । शारदश्री ही
धनधान्यें[2] मुबलक तशीं आयुधें संरक्षक नाही!
हें भाग्य पुन्या मापाचें । अबादानीचें । कधीं ये पदरीं?
मज दिसे कधीं का भरतश्री[3] ही नटली याचपरी!
ही एकचि माझ्या मनीं । हांव निशिदिनीं । नाचते नाच
घुसघुसळी प्रभुच्या दयासागरा घडिही थांबेनाच!
ती स्वतंत्रतेची सुधा । लाभते कदा । नसे मज कळलें
"नतवांच्छित पुरविल देव" पूर्ण हें तथापि मज पटलें!
हरि–दारीं धरणें धरूं । हवें तें करूं । मुक्ति जोडाया
द्रव दगडाही ये यत्नें, नवल न हरिला त्या सदया!

---

## ३९ सांत्वन.

[ अभ्यास चांगला करूनही नापास झालेल्या विद्यार्थ्यानें असेंच सांत्वन करून पुन्हा उद्योगाला लागावें लागतें. ]

**श्लोक.** [ वृत्त–शार्दू० वि० ]

होणारें घडलें कशास इतकें लावून तें घ्या मना
आहों आपण सूत्रचालक जगीं थोडेच वेड्या जना!

---

१ उषासमयींचा अर्धचंद्र जणु तिच्या हातांतल्या दागिन्याप्रमाणें भासतो तसा विळा शारदश्रीच्या हातांत असा भाव. २ कोणालाही धनधान्य आणि सुरक्षितपणा असल्यावर मग काय कमी आहे? ३ हिंददेवी.

यावत् शक्य कसून तूं तुज जमे तें कार्य संपादिलें
द्यावा दोष कुणास कीं यश नसे त्यांतून देवें दिलें?
योजावीं मनुजें समस्त तितकीं कार्यें घडावीं पुरीं
हें पुण्यांश असेल पूर्ण पदरीं त्याच्याच साधे करीं
कुंभारें घडले घडे टिकति कां सारेच आव्यामधीं?
बाजारीं भिडले न तोंच कितिचीं वाटेंत होतीं भर्दीं!
आकाशीं जमतांच मेघ तिकडे हर्षें किती निर्भर
लावी चातक दृष्टि, चोंच पसरी तोयार्थ[1] अत्यातुर
" हा नाहीं तर तो पडेलचि " म्हणे पाहील तो त्या घना
माथां वीजाचि फोडि तों! गति तुझी रे तीच हो मन्मना!
मोहें केवल सौख्यगर्भ[2] गणिलें ज्या भावि कालाप्रति[3]
हा हा! केवल कालकूटमय[4] तो ये प्रत्यया संप्रति!

---

## ४० गोरा कुंभार.

[ गोष्ट फारच जुन्या काळींची— 'आजकाल'चीच नव्हे! योगक्षेमासाठीं स्वकर्म करितांना निजानंदांत गर्क झालेला संत (!)गोरा कुंभार पायांखालच्या चिखलांत आपली प्रजा आपणच तुडवून मोकळा झाला! त्याच्या स्त्रीचें अर्थात् मृतजीवांच्या आईचें हृदय ककवळून बोलूं लागलें:-]

**पद.** [ **चालः**—घुबडा बोलरे घू घू! ]

गोऱ्या! नाच हा थांबवि
पदीं न तुडवी जीव! ॥ ध्रु० ॥

---

१ पाण्यासाठीं. २ सुखांनीं भरलेला. ३ पुढचा काल. ४ कालकूट—विषाप्रमाणें कडूजहरी!

प्रजा तुझ्याही पायां लागे । आळवून तुज दुबळी सांगे ।
कींव भाकतां पुरती भागे ।
असून ठावा देव तुला तो कशी न ठावी कीव? ॥ १ ॥
तुला हवें तें घडवायाला । चिकी पुरेशी ये मातीला ।
उगीच कां मग नाच लाविला?
तर नच शिक्यावर ही हंडी चढेल, घे जाणीव! ॥ २ ॥
जिवानिशीं तूं प्रजा आपल्या । खुशाल मातिस कशा मिळाविल्या?
मिळतां मिळतां शापा वदल्या ।
शाप लागल्या तुज नरकाची भिडे कपाळा शींव! ॥ ३ ॥
खराखुरा रे तूं कुंभार! । माथां मडकीं वागविणार ।
मेंदुविणें हें मडकें तव शिर!
म्हणून भेसुर नंग्या नाचीं तुझा रंगला जीव! ॥ ४ ॥
मृण्मय कोमल किती बाहुलीं! । खुशाल त्यांची माती मळली ।
उलटें काळिज करणी काळी! ।
'गोरा' तुज मी म्हणूं कसा कीं म्हणतां भरतें हींव! ॥५॥
निजानंद हा तुझा असेल । त्यांत धुंदिचा लय लागेल ।
तरी विसरणें बरें न शील!
माणुसकीला अशा राक्षसी रंगें ना रंगीव! ॥ ६ ॥
भारा भरती कशास बोलूं? । सालीमागें साली सोलूं? ।
अंतरंग हे कशास खोलूं?
वरचा खालीं क्रमें ये कळो तुला नियम हा ठरींव! ॥ ७ ॥
चाक जगाचें सदैव फिरतें । तुलाहि गोऱ्या तें फिरवीतें!
वरच्याला तें खालीं नेतें!
चिखल आजचा उद्यां तव शिरीं खराच ठेविल देव! ॥ ८ ॥

# ४१ सांगा कां भरतां तशी रिचवितां– ही वाजते घागर ?

[ अशिक्षित ह्मणण्यापेक्षां बुद्धिहीन बापाच्या चौकस मुलाची कोणतीही विचक्षण शंका अशीच फिटायाची ! ]

**श्लोक.** [वृत्त--शा० वि०]

" सांगा कां भरतां तशी रिचवितां ही वाजते घागर ? "
बाळानें अति कौतुकें निज पित्या हा प्रश्न केल्यावर
गेला काळ किती समर्पक तरी त्या नाठवे उत्तर
वाया बुद्धिस ताणवून शिणवी डोकें दुखे तोंवर!

चित्तीं खंत करीः--' न चौकसपणें अभ्यास वेळींच मी–
केला; माहितही असून मतिचा जात्याच थोडा कमी !
त्याचें हें फळ; आज बाळहि मला प्रश्नें करी कुंठित
पस्तावाहि फुकाच ! आज सुधरूं कीं ये न पूर्वार्जित ! '

कष्टी जीव उगा अशापरी बसे तों ये तिथें कोणसा–
स्नेही; स्वागत त्या सहास्यवदनें केलें वचें " या बसा ! "
उत्कंठावश बाळही परिचिता जाणून त्या आपला–
टाकी प्रश्न; अतिप्रसंगाचि पित्या वाटून तो कोपला !

+ + +

रंगे श्रीमुख लागलींच " फिटली शंका "–ह्मणे बाळक.
कीं डोळे भरतांहि तेविं गळतांही वाजले तन्मुख !

## ४२ शोकलहरी.

[ सांगली मुक्कामीं कृष्णातटाकीं वाळवंटांतून सायंकाळीं फिरतांना एक जळती चिता दिसली तिनें मन उद्विग्न झालें. ]

### श्लोक. [वृत्त–शिखरिणी.]

प्रिया–श्री– संगें श्रीपति तरणिमध्यासनगत
नभःकासारीं जों करि जलविहारा प्रमुदित
अहो तों अस्ताद्रि प्रखर कटकप्रांत भिडला
किती कारुण्याढ्य स्थिति अशरणा ये तरणिला !
क्षणीं मेघामेघामधिं तुमुल माजे रण जसें
जसें त्याला फावे गगन हिसकी तो मग तसें !
दडे संध्या वेगें जणु कुजन बाधाभयमिषें
नसे शास्ता तेथें टळति विरळा घातहि असे !
धुमे घो घो वारा उडवित भरारा कण किती–
तदा वाळूचे जे शिरति नयनीं फार खुपती
कणार्ताक्षी कृष्णा तळमळ जणूं काय करिते !
न या लाटा येती गडबड तिची लोळणचि ते !
क्वचित् तारा पावे स्फुरण; गमतें हास्य विकट
जसें विश्वग्रासोद्यत तिमिर–दैत्येंद्र करित !

---

१ सूर्य. सूर्यमंडळ मध्यवर्ती लक्ष्मी नारायणाची जोडी असते हें आर्यधर्मीय तत्व आहे. श्रीपति म्हणजे विष्णु तसाच सूर्य. श्री म्हणजे लक्ष्मीसहित, तरणीमध्यें म्हणजे होडीमध्यें बसून आकाश सरोवरांत जलक्रीडा करणाऱ्या विष्णूच्या होडीला अस्ताद्रीच्या खडकाचा धक्का लागून होडी पिचली व त्या प्रेमी जोडप्यासुद्धां बुडाली-सूर्य बुडाला हा भावार्थ. २ कणांनीं जिच्या डोळ्यास इजा झाली आहे ती. ३ जग गिळण्यास तयार झालेला.

जवें एका वस्तूवराति दुसरी वस्तु गिळत
क्षणीं तो सावर्ण्यें सकलहि निजांगीं मिळवित!
तटीं संध्याकर्मे द्विजनिकर सारून परते
घरा नेती सारे पशुप पशु पाजून जल ते
धुणें पाणी होतां लगबग घरा जाति ललना
सखा एकाकी मी तिमिरमय त्या होय पुलिना!

तदा कानीं नाना ध्वनि पडति ज्यांनीं मन चळे
तरंगांच्या झुंडी. विविध उठताती प्रतिपळें
स्मशानीं तों देखें अवचित चिता दूर जळतां
जिथें नाचे ज्वाला चल करिति कीं कालदुहिता[1]!

× × ×

अहा ज्वालामौलीमुख[2]! तव मुखीं काल यम हें!
असें कोणी बाला युवक अथवा बालकचि हें?
यदंगातें लोला लगटति शिखारूप[3] रसना[4]
उपाशी तो होशी किति दिन अधाशी अकरुणा?

गळे डोळां पाणी, फुटत वदतां शब्द न पुरा,
"जपा माझीं बाळें—परकि न करा—हो प्रियकरा"!
विजेनें लोळावी विटपें—कलिताही[5] नव—लता
तशी नाथांकींची[6] गिळसि यम ही काय ललिता?

असे हा वा कोणी गुणखनि युवा त्वन्मुखगत?
पितामाता ज्याचीं पडलिं उघडीं, हा अवचित!
नवा बाला त्याची रुचिर रमणी शोकविकला
कशी काला! कंठी प्रियविरह आतां हतबला!

---

१ यमाच्या मुली जणु. २ अग्नि हेच ज्याचें तोंड आहे तो. ३ ज्वालारूप. ४ जिभा. ५ वृक्षानें कवळलेली. ६ नवऱ्याच्या मांडीवरून

सदा ज्यानें त्यानें सकुतुक चुचुंबून सुदृढ
उराशीं बांधावें निवत मनिंचा ना तरि कढ!
अशा प्रेमा ज्याच्या उपजविति लीला जनमनीं
सदानंदी[1] कोणी शिशु[2] जळत हा काय दहनीं?
महात्मा वा कोणी परहितपर[3] स्तुत्यचरित[4]
असामान्यें धीरें सहज सहतो हा अविरत—
ज्वलज्ज्वाला[5] ताप प्रखर तव; हा लाजवि तुला
तुला काला बोले:—"तव भय भित्या दाव; न मला!"
असंख्या पापातें सतत परि सेवून अनला
निजांतर्बाह्यांगीं[6] सकल जणु होसी विघडला
पडे चिंता "लोकीं म्हणतील कसे पावक[7]" तुला
'सताम् सेवा हो' त्यावर तुज कुणी मार्ग कथिला!
सताम् सेवा[8] भावान्वित समुचिता सेवकाहित
करी ती हे कालानल, खचित आहे सुविदित
परंतु त्यासाठीं अनुचित उतावीळ असणें
बरें कां हें स्वार्थास्तव इतर नाशार्थ सजणें?
अरे ही तों होती नवयुवति! संसार कसला
हिला ठावा ना तों तव उरगसा[9] पाश डसला!
कशी कोमेजे ही उमलत पुरी जों नच कळी
यमा कां जन्मावें जर टपसि तूं नित्य जवळी!

---

१ सदा आनंदांत असणारा. २ रांगणारें मूल. ३ लोकहिताला जपणारा. ४ स्तुतीला पात्र आहे चरित्र ज्याचें. ५ अग्नि. ६ आंतून बाहेरून. ७ पावन करणारा. ८ संतांची सेवा. ९ सापाप्रमाणें.

अरे फुल्लांभोजा ह्मणविल उणें नेत्रयुग[1] जें
हिचें पूर्णेंदूंला[2] वदन दिसतां लाज उपजे!
शिरीषाला साजे न मृदु वदणें ज्या अवयवीं
कशीं तीं सारींही अरसिक यमा जाळिसि दवीं[3]?
अरे हा तों होता असुचिर कृतोद्वाह[4] तरुण
सुविद्येचा सांठा सविनय सदा सत्यवचन!
खरें सौजन्याचें जन-विदित[5] माहेर घर हा
तशा ही तूं नेतां यम नच कसा निंद्याचि मह्रा?
अरे याची राष्ट्रोदय खचित विद्या घडविती
खल--त्रासा नेती जन चढविती उन्नतपथीं
इहामुत्रश्रेयः[6] पथ सुचविती आचरविती
यमा! मातीला ती परि मिळविली तूं कटुमती!
करी मुग्धा शुक्ति[7] प्रकट मधु[8] मुक्ताफल निज
दशा तारुण्याची तदिय गुण तीं तेविं सहज
प्रकाशातें येते तरि अमरते[9] ते मिळविते
जडें हाडें देते तुज यम, यशानें हिणविते!
कितीं मुग्धें पुष्पें अवचित वनीं तीं करपतीं
कुणा ठावी त्यांची वसति गुण, संख्याहि नसती!
जगा साऱ्या ज्यांनीं वश सहज केलेंच असतें
क्षणीं यत्सत्संगें सुखित घडतीं दुःखितशतें!

---

१ दोन्ही डोळे. २ पूर्ण चंद्राला. ३ अग्नींत. ४ नुकतेच ज्याचें लग्न झालें आहे असा. ५ लोकप्रसिद्ध. ६ इहलोक व परलोक या दोन्ही ठिकाणच्या कल्याणाचे मार्ग. ७ शिंप. ८ सुंदर. ९ देवपणाला.

समुद्राच्या पोटीं अगणित दडे रत्ननिकर[1]
जगाच्या पोटीं हा पुरुषललना रत्ननिकर !
प्रसिद्धीला ज्याचें सुगुण पुरते येति नच तों
यमा दुष्कामा[2] तूं ! तव कर कुकर्मी न चुकतो !
असो मृत्यो ! आतां तरि मजकडे कान कर गा !
गुणाढ्या न्यावें ना लवकर; तयें हानिच जगा
परंतु मारावी त्वरित खल नाशार्ह[3] जनता
जगा पीडा निष्कारण करित जी संत पतितां !
यमा तूं देवाज्ञानुचर[4] निरुपायेंचि करणी—
कसाबाची लागे तुजसि करण्या ही निशिदिनीं
खरें हें आहे बा तरिहि जर तूं वेंचिसि वच
भिडें आज्ञा देऊं प्रभुकर जरा खाइल कच !

---

## ४३ आत्मार्पण.

[ " Pluck this little flower " या श्री रवींद्रनाथांच्या गीताचा अनुवाद. ]

**लावणीची चालः—**

घे खुडून ही कोवळी उमलती कळी तुझ्या करकमळीं
ना उशीर आतां लाव धांव रे प्रियकर वनमाळी !
वाळून कोळ इतक्यांत गळे मातींत कळी कीं काय ?
या जिनें घेतली एकसारखी हीच एक हाय !

---

१ रत्नांचा सांठा. २ दुष्ट बुद्धीचा. ३ नाश करण्यायोग्य. ४ देवाच्या आज्ञेप्रमाणें वागणारा.

तव गळ्यांतल्या माळेंत ठाव न मिळत मिळो नच परता
 पण नखें दुखिव मज कर स्पर्शसुखलाभ त्यांत पुरता !
निज सर्वस्वा तव पदीं वहावें कधीं हें न कळतांच
 हा बहर मावळे काय कदाचित् हीच हिला आंच !
नसे नसो रंग या गडद गंध हो मंद तरी हें फूल
 घे खुडून पदरीं ठेव लोटला जों नच वाडूळ !

---

## ४४ तारुण्याचें ध्येय.

### भूपाळी.

ऊठ भारता, सुचिर निद्रिता, अचिर जागृता शुभकाळीं
अज्ञानाची हीण कळेची सरली साची निशि काळी !
श्रीवेदांची वाणी साची खडया सुराची सांगतसे
" कीं दुबळ्यांनीं आत्मज्ञानीं कधींच होणें शक्य नसें " !
या शुभकालीं ठरवा कसली पुढें आपली स्थिति व्हावी
चढती अढळा रोज नवकळा कीं हीनकळा निवडावी ?
तारुण्याची ऐन भराची चमक विजेची जों देहीं
आहे उसळत मनास घुसळत ध्येय तोंच घ्या तरि कांहीं !
इरें देहिंचें विरे न जों वय उतार झालें न जो असे
ध्येय धरावें करीत जावें स्वकार्य भावें अखंडसें ?
या तरुणानों, झटा करा निजकार्य न त्याला खळ पाडा
आधारावर तुमच्या आहे उभा प्रगतिचा हा वाडा !

---

१ फार वेळ; वाढ+वेळ. २ " नायमात्मा बलहीनेन लभ्यः " ही श्रुति आहे.

कधीं कुणाला क्षण न लाभला परिमल ज्यांचा जगतांत
किंबहुना नच कधीं शिवाशिव करी कुणाचा ज्या हात
अशींच केवळ फुलं घातलीं फुलें घालणें देवाला
निर्मल असलीं तरिच रुचतिल शिरीं प्रभूला ध्यायाला !
फुलासारखी घडि दुघडींची जोत जिवाची नाजूक
देवापायीं ओपायाची पाहिजेच तर साजूक !
" जिव्हाग्रावर खडा निरंतर जसा कायदा नाचविणें
निष्कारणही झटून आपण पुंड[1] केलीला माजविणें " !
क्षुद्र वृत्ति ही सोड भारता, न धरी असला हव्यास
भलत्या नादें शक्ति वेंचणें कारण होतें हास्यास !
उदंड ज्यांचें महत्व असल्या कितीक गोष्टी या लोकीं
दुर्लक्ष्यानें नाश पावल्या आतां तरि त्या अवलोकी !
निज राष्ट्राचें आणि जगाचें हित साधाया निजोहुति[2]
देणारांची किती थोरवी ! श्रेयस्कर ती किती कृति !
क्षुद्र जिवाची परवा कसली ? आत्म्याचा अविनाशिपणा
परिचित पुरता आर्यजनानों, असे तुह्मांला किती जुना !
असो अशाश्वत असलें जीवित तर; आत्मा पण अमर सदा
" जन्मा आल्या जीवा न चुके मरण येतसे यदा कदा " !
असें असे तर उच्च खरोखर मनीं ध्येय दृढ कांहिं धरा
धरल्या ध्येयास्तव झटतांना श्रेयस्कर मरणाहि वरा !
युगानुयुग हरि अवतारा धरि जगदुद्धारास्तव वरद
तोच कृपाकर इष्ट सिद्धिकर तुह्मांस पावो गोविंद !

---

१ भांडणें तंटे. २ आपली आहुति.

# ४५ भिकारीण.

[ उदंड पगारवाल्या बापाघरीं पोटाला आयतें मिळत असणाऱ्या मुलीला दारिंची भिकारीण कस्पटाप्रमाणें वाटायचीच ! ]

श्लोक. [ वृत्त–शार्दू० वि० ]

भिक्षा घालिसि ना मला उलट तूं मौजेंत वेडाविसी
कां देतेस शिव्या उगा परिजनाहातून कां दंडिसि ?
तोही तूं जसली दयालु (?) तुमच्या कीं पुष्ट अन्नावर !
कीं स्वाभाविक मालकापरि जगीं वागे खरा चाकर !
त्रेधा तूंच यथेष्ट वांच्छिसि करूं माझी तिथें चाकरें
निर्लज्जें हिसकून कां निजकरें घ्यावीं न हीं लक्तरें ?
दारोदार फिरून जे मिळविले कष्टें उन्हांतून मीं
ते सारे तुकडे कसा करिल तो मातींत फेकूं कमी ?
मानेला हिसडून हा ढकलितां मी लोळलें भूतलीं
हर्षें लोळसि तें बघून निवले डोळे तुझे कां मुली ?
कोणा माहित काय संचित तुझें जें बुद्धि दे यापरी
जातें मी स्वपथें हताश पण हें ऐकून घे अंतरीं !
" होतें मी सधना सुरूप युवती उन्मत्तही तूं जशी
दारोदार तथापि आज फिरते मत्संचितें हीं अशी ! "

---

# ४६ आशाभंग.

किर्लोस्करवाडी येथें दक्षिणभाग वृत्तकार्य संघाच्या ( The Postal Union Deccan Division) रविवार ता० २६।२।२२ रोजीं भरलेल्या सभेस जाण्याविषयीं अत्यातुर असून ही अकल्पित अडचणींनीं आडविल्यावर निराश झालेल्या जीवाला असें स्वप्न पडलें तर त्यांत वावगें काय ?

## श्लोक—[वृत्त—स्वागता.]

पोंचलें मज निमंत्रण पत्र । होय उत्सुकहि चित्त विचित्र
" तो कदा जवळ ये रविवार " ! । छंद हाच जडला अनिवार !
ये कसा तरि पुढें रविवार । चित्त जाय हरखून अपार
मी मनोरथजवें[1] पद टाकी । " पंख दे अदेय देव न कां कीं ? "[2]
घे कडेवर जशी मज गाडी । चालते किति सवेग अघाडी ?
दूरची जवळ ये किति वाडी । गारुडीच[3] कृति काय न गाडी ?
ती समोर दिसते मज वाडी । वृत्तगेहहि[4] तसेच वरौडी
वृत्त–कार्यकर[6] संघ मिळाला । शोधण्या स्वहितकारि पथाला
दक्ष वृत्तपति[7] दीक्षित येती । स्वागता करिति सादररीती[8]
वृत्तगेहपथ दाविति मित्रा । दक्षता निपुण ती स्तुतिपात्रा !
न्याहरी त्वरित अल्प करून । एकमेक सुखदुःख पुसून
स्नानकर्म करण्यास निघावें । प्रश्न हा मजपुढें सरसावे.
शीत–तोयरत[9] कांहिं तसे ते । उष्णभक्तहि किती जन होते
दग्ध[10]जीवन उणेंच गुणानें । स्नान काय करणें मग त्यानें ?
ती विहीर भरली बहु तोयें । पोहत्या स्फुरण कां मग ना ये ?
त्या धडाधड उड्या पडतात । घोष भीषण नभा भिडतात !
उंच तोय–कण[11] ते उडतात । एकमेकहि तसे भिडतात
आदळे जळ जवें दुथडीला । काय ये स्फुरण आज तयाला ?

---

१ मन हेंच कोणी रथ त्याच्या वेगानें. २ मला पंख दिले नाहींत ह्मणून देव निर्दय आहे काय असा भाव ? ३ जादू. ४ पोष्ट आफीस. ५ पाहुणे. ६ पोष्टखात्यातील लोक. ७ पोष्ट मास्तर दीक्षित आडनांवाचे. ८ आदरपूर्वक. ९ थंडपाण्याचे भक्त. १० जळलेलें पाणी. ११ पाण्याचे कण.

एकमेक बुडती बुडवीती । तोय तें चहुंकडे उडवीती !
तो विहार शिणवी सकलाला । भूकही खवळली समयाला
बेत तो गरिबिचा जरि साधा । तो विलक्षण धरी रुचि रांधा
कीं श्रमेंच रुचि ये जिनसाला । व्यर्थ वेंचिति खराच मसाला !
श्लोक मार्मिक जुने तर कोणी । नाटकी ह्मणति मोहक गाणीं
त्या मयूर सखिचाहि[1] विलास । आर्याचित्त सुखवी समयास !
भोजनोत्तर घडीभर झोंप । भाषणें कितिक वा अनुरूप
सोंगट्यादि सुचती मग त्यांना । खेळ कालहरणास्तव नाना !
लागला क्षण तदा मम डोळा । लागतां पण न माहित झाला
योगनिद्रित[2] असा असतांच । हो चमत्कृति[3] अपूर्वचि साच !

वृत्त—मंदाक्रांता.

आला कांनीं परिचित मला रोजचा शब्द तोंच
“ झाला प्रातः समय उठणें स्नान साधूं--चलाच ” !
आश्चर्ये मी त्वरित उठलों चोळिले नेत्र पाहें
तों खंडाळा[4] मजसि दिसला, हाय ! वाडी न आहे !
ती नित्याची मजसि दिसली आपली वृत्त--शाला[5]
प्रातर्गीतोत्सुकहि[6] चपला ती सुघोषा[7] उशाला
‘ कर्तव्याशीं समरस सदा हो ’ असें सूचवीत
टकूटकू काव्य ध्वनिर्मय[8] घटीयंत्र[9] होतेंच गात !

---

१ मोरोपंतांचीं आर्या. २ अर्धवट झोपेंत. ३ चमत्कार. ४ खंडाळा नांवाचें गांव. ५ पोष्ट आफीस. ६ प्रभातगीत भूपाळ्या अर्थात् सकाळचा आपला धंदा करण्यान उत्सुक. ७ विजेच्या योगें चालणारें तारायंत्र. ८ ध्वनिकाव्य ह्मणजे ज्यांतलें तात्पर्य मनानें जाणण्याचें असतें तें. ९ घड्याळ.

आतां नित्यक्रम मम सुरू मी करूं भाग आहे
 'कां व्हा' कष्टों असुलभ सुख–प्राप्ति वांचून मोहें ?
खंडाळ्याशीं खचित खिळलें काय देवा, अखंड
 माझें दैव प्रतिदिन मला हीच शंका उदंड !

वृत्त—स्रग्धरा.

माझी दूरावलेली प्रिय मिरज उभी रोज नेत्रासमोर
 राहे तों चित्त माझें तळहळत जसें आइवांचून पोर !
"देवा ! कारा[1]निवासापरि मज परका देश हा वाटतो कीं
 मातें नेणार माते[2]जवळ तरि कधीं ? या दया ठेव तोकीं[3] ?"

---

## ४७ गंगावतरण.

[ हल्लींच्या विस्कळित समाजस्थितीचा–विशेषतः ब्राह्मणजातिवर कोसळलेल्या इतर सर्व जातींच्या स्थितीचा–विचार करीत असतां समोरच्या भिंतीवर टांगलेल्या राजा रविवर्म्याच्या गंगावतरणाच्या तसबिरीवर सहज नजर जाउन खालील कविता सुचली. ]

**श्लोक–वृत्तः**–[ शार्दूल विक्रीडित. ]

शंभूच्या हरिवज्र[4]शा घन जटाजूटा चुरायास ये
गंगादुर्मद–मत्त वेगमुखरा[5] धारा सहस्राश्रयें
झाली तोंच हताश होय लपली तेथेंच एका पळीं
गर्वांढयास असाच विश्वर करी भेटून काळें बळीं !

× × ×

---

१ तुरुंग. २ जन्मभूमि ह्मणजे माताच होय. ३ मुलावर. ४ इंद्राच्या वज्राप्रमाणें कठिण. ५ वेगामुळें वाजणारी. ६ मजे.

" गंगा ही पडतां महाजेव शिरोभंगा चुके ना करी
आतां काय करूं? प्रिया! तुज सुचे रे बुद्धि ही ना बरी!
या आल्याच अगाइ! मोजवति ना धारा किती कोसळूं
जोडूं काय इलाच हात? विनवूं 'गंगे! पडावें हळू!'
केलें त्वां तप थोर; घोर पण हा माझ्या जिवा लागला!
काळें हाय! भगीरथा, तुजमुळें मन्नाथ हा व्यापिला!
उद्धारूं शकशील सागर–कुला[2] या तोयदानें[3] तरी
माझा संसृतिनाश सत्वर तुझ्या नाशा कसा ना करी?"
चिंताग्रस्त अशी उभी गिरिसुता[4] लावून नेत्रा नभीं
तों गंगा पडण्या अधोमुख जवें तेथून ती आरभी
आली शंभु जटेसमीप लपली तत्काल तेथेंच ती•
तों गंगामदभंग न प्रियशिरोभंगा बघे पार्वती!
आकाशीं अतिरोषें[5]–रोहित तदा रोखून नेत्रद्वय
ऐकी कान उभे करून घनसा गंभीर अंभोरव[6]
शृंगें ही करि सज्ज तोय रगडूं पाहे बळानें भला
स्वस्वामिव्यसना[7] निवारण करूं नंदी उभा ठाकला!
मातीला उकरीत दक्षिण पदें गर्जे मुखें भीषण
पुच्छा उच्च करून धांवत तसा थांबेहि एक क्षण!
किंचिन्नम्र करून शृंगयुग[9] जों पाहे हणाया जला
तों स्वामी सुखरूप; मात्र लपली गंगा बघे तोषला!
धो धो धो ध्वनि तो भगीरथ मनीं ऐकून संतोषला
" आतां उद्धरतील पूर्वज, भली लाभेल कीर्ती कुला"

१ वेगवान्. २ सगरराजाचें कुळ. ३ पाणी मिळाल्यानें. ४ पार्वती. ५ रागानें लालेलाल. ६ पाण्याचा खळखळाट. ७ आपल्या धन्यावरचें संकट. ८ उजव्या. ९ दोन्ही शिंगें.

चिंती यापरि तोंच तीव्र--गिरिजा[१]--वाग्बाणविद्धांतर
गंगालोप बघून लागत पदीं "भो शंकरा, शं--कर[२]!"
"हा हा होय अनर्थ! केविं विफला झाली तपस्या मम?
माझे पूर्वज तारण्यास सजली गंगा उदारक्रम[३]!
ती येतां सहसा लपे पण कशी या त्वत्कपर्दीं[४] हरा?
दे शोधून कृपाकरा, तुजविणें नाहीं मला आसरा!"
स्त्रीसाधारणमोहमूढ[५] गिरिजा गंगेस मागे चुडे
यावत्शक्य करून पौरुष सजे नंदी हरूं सांकडें
गंगापात--सुखी भगीरथ; अशी त्रेधा तिघांची मनें--
आलोकून शिवास कौतुक भलें वाटे तदा उन्मनें!
तों गंगा लपतां अतर्क्य विभुचें सामर्थ्य सर्वां कळे
सारे विस्मयमग्न पाहाति नभीं चित्रीं जसे रेखिले!
गंगागर्वहरा भगीरथ करां जोडून याचीतसें
स्वानंदीं शिव मग्न हास्य वदनीं भारी खुले रम्यसें!
गंगेचा जिरला पुरा मद जटा--गुल्मीं फिरे भ्रांतशी
ती बाहेर पडूं झटे परि मिळे ना छिद्र कोठें तिशीं
ती आली शरण प्रभूस मग तो सोडी तिला हांसत
लाभेना इतरत्र सौख्य विजयानंदांत[६] जें लाभत.

वृत्त--[ वसंत तिलक ]--गंगा न ती शिवकृपा जणु मूर्तिमंत
कीं पुण्यसिद्धि रचिली सुतपें दुरंत[७]
झाला भगीरथ--मनोरथ सिद्ध अंतीं
यत्नेंच दुष्कर मनोरथ सिद्ध होती!

१ पार्वतीच्या शापानें मंगलें आहे काळीज ज्याचें. २ कल्याण कर. ३ उदार चालीची. ४ जटाजूटीं ५ स्वाभाविक भित्रेपणामुळें वेडावलेली. ६ विजय मिळाल्यामुळें होणारा आनंद. ७ अलोट, न संपणारी.

धारा या न असंख्य जाति विविधा या दुर्धरा वर्षिती
स्वर्गंगा स-तरंग[1] ना मज दिसे ही लोकगंगाच ती
ना धीरासन[2] ठाकला शिव बळें गंगेस बाहूं उभा
हा शांत द्विजवर्ग[3] सर्व विषमा दे वर्षणाची मुभा!
हा भालीं तिसरा न नेत्र, विलसे सुज्ञान[4]-मुद्राच ही
हा चंद्रार्ध न, मूर्तिमंत विलसे चिच्छांति ही प्रत्यहीं
पाठीशीं कच[5]भार हा न, पडलें अज्ञान कृष्णाकृति[6]
श्रेष्ठत्वा स्वगुणेंच मानव चढे त्या कोण ना वानिती?
हा लंबोत्तर[7] शूल ना, समपणा हा सन्मनाचा स्थिर
उग्रें दुर्दम इंद्रियेंच नच हीं, सर्पादि जे अस्थिर!
ही आचार-पवित्रता नच, चिता भस्मप्रभा शोभते
कार्यांची विलसे गळीं विविधता ना, अक्षमालाच[8] ते!
जात्या कोमल भाव[9]पूर्ण जनता ही वाटते मन्मना
चिंताविद्ध न पार्वती वदतसे शापास जी कोपना
हा नंदी नच, उग्रवृत्ति[10] जनता ही पाशवी[11] शक्तिची
शस्त्रास्त्रा सजवी निजोन्नति करूं पाहे अविघ्ना रची!
गंगा आणविता भगीरथ न हा, हा लोकनेता धिमा
सोसूं सिद्धचि दैवदुर्विलसिता सर्वा असंख्या समो[12]
स्वध्येयास धरून तन्मय दिसे झाला महात्माचि तो
विश्वोद्धारक शांतिसागर तपा साधी शिवा याचितो

१ लाटांनीं युक्त. २ न डगमगणारा. ३ ब्राह्मणवर्ग. ४ ज्ञानाची खूण ह्मणजे डिग्री, पदवी. ५ केसांचे झुपके, जटा. ६ काळ्या आकाराचे. ७ आडवा भाला किंवा त्रिशूल. ८ रुद्राक्षांची माळ. ९ मवाळ मनांची माणसें. १० एक घाव दोन तुकडे अशा स्वभावाची. ११ पशूसारखी. १२ वर्षें.

टाकी जों द्विज राज[1]शेखर जटा भंगार्थ गंगा उडी
तो क्षांति[2]स्थिरधी धरी तिज शिरीं तों लाजली बापुडी
सारा गर्व गळे समोह भजनीं त्याच्याच ती लागली
ऐकूं गोष्ट कधीं मिळेल असली! आतां द्विजानों भली?
ना व्हावा निजशीर्षभंग पडतां ही लोकगंगा शिरीं
विप्रानों, भवे[3]दिष्ट हें निजमनीं घ्या या उपाया तरी
व्हा आचार-पवित्र पूर्ण, सुतपस्तेजेंहि व्हा उज्वल,
अन्योत्कर्ष[4]सहिष्णु व्हा दमशमें, आत्मीय[5] जोडा बल!
'वर्णानाम् गुरु'-तेस पूर्वज कसे होते बरें पावले?
याचा कांहिं करा विचार तिरकीं टाका न हो पावलें!
मध्यान्हार्क[6]हि पाहवे निज[7]सुखें पापग्रहें[8] ग्रासला
निस्तेजावर वक्र दृष्टि[9] करणें सोपें न कोणा खला?
हा आहे द्विजराज[10] शोभत जिथें, तेथेंच गंगा वसे
त्या दोघां शिरसा सदाशिव सदा तो मान्य मानीतसे
देवाच्या घरचा जुना समपणा हा दूर कां टाकितां?
वैरा माजविता परस्परहिता कां विप्र हो नाशितां?
राष्ट्रप्रेम[11]-नदी मिळून भरली ही लोकगंगा नवी
हे तत्तीरनिर्वासि[12]भारत सुखी होवोत आतां भवीं[13]

१ द्विजराज म्हणजे चंद्र ज्याच्या मस्तकीं आहे तो शंकर;-पक्षीं ब्राह्मणवर्गांतील श्रेष्ठ लोकांच्या माथीं. २ क्षमा. ३ आपलें इष्ट काम. ४ लोकांचें बरें झालें असतां आनंद मानणें. ५ आम्यासंबंधीं ६. मध्यदिवसाचा सूर्य म्हणजे अतिशय तेजस्वी सूर्य. ७ सहज. ८ दुष्ट ग्रह म्हणजे केतु. ९ वाकडा डोळा. १० चंद्र. ११ राष्ट्रावरल्या प्रेमाची नदी. १२ त्या तीरावर वसलेलें. १३ जगांत.

लोपो ऐहिक[1] ताप, मोक्ष[2] पदरीं येवो त्वरें यास्तव
हा गंगाद्विजराजशेखर[3] धरूं ध्यानीं, करूं या स्तव[4]!
पूर्वीं सागर उद्धरून जगतीं गेलेच गंगेमुळें
कां ना उद्धरतील भारत तरी हे लोकगंगावळें?
रक्षा[5]–पर्वत ती नदी हरि; हरो ही हीनतेजस्विता[6]
ती दे मोक्ष भवीं, तशी परिहरो वेगें पराधीनता!

---

## ४८ अभिनंदन.

**श्लोक.** [ वृत्त—स्रग्धरा. ]

ब्रह्मापासून जन्मा जग धरि जग तें हो तसें ब्रह्मलीन
सारें पाणी समुद्रीं परत रिघतसें कीं निघे तें तिथून
'ए बी' मूलाक्षरांची श्रवणसुख तशी ही परावृत्ति[7] रम्य
स्त्रीला भूषा सुवर्णा अतिशय, पदवी ही नरा तेविं काम्य!

---

## ४९ आत्मवंचित.

व्यसनें तितकीं सर्वथैव त्याज्य ही गोष्ट कोणास मान्य नाहीं? अशा सर्व मान्य गोष्टीला सोडून जाणते लोक देखील व्यसनी होतात तर मग ते आत्मवंचित नव्हेत काय?

---

१ इहलोकींचा. २ मोक्ष; पक्षीं स्वातंत्र्य. ३ गंगा आणि चंद्र ज्याच्या शिरीं आहे तो; पक्षीं लोकगंगा आणि ब्राह्मण वर्ग ज्याच्या शिरीं आहे असा समाज हाच कोणी देव ४ स्तुति. ५ राखेचे डोंगर. ६ दुबळेपणा, फिकेपणा. ७ ए बी सी अशी शिकण्याला सुरवात होऊन तिचा शेवट बी. ए. होण्यांत होतो ह्मणजे जगाच्या रहाटी प्रमाणेंच हें आहे हा भाव!

## श्लोक. [वृत्त–शा० वि०]

पूर्वेला विभवाढ्य बालरविचा होऊन बिंबोदय
तेजें दिग्विजया करीत गगनीं येतांच विश्वंजय[1]
आली सन्मुख मोहिनी प्रणयिनी त्या खूणवी वारुणी[2]
श्रीमंता तरुणा अशाच जडती वारांगना[3] वारुणी[4] !
ती बाही:–" तरुणारुणा, प्रियकरा ! माझ्याकडे लौकर–
ये ये आतुर! संगमास्तव तुझ्या मी, धांव जीवेश्वर ! "
भोळा सूर्य भुले गणी तिज खरी आत्मानुरक्ता[5] सखी !
कंठालिंगन–लुब्ध[6] सत्वर करूं घावे स्वताला सुखी !
" तें शोभे रमणीय पश्चिमनिधी कांठीं तिचें मंदिर
तेथे वैभव सर्व पूर्ण भरलें भोगीन चेतोहर[7]
ठाके सोत्सुक ती सजून रमणी माझें करूं स्वागत "
चित्तीं चालति हे विचार रविच्या जों त्या दिशे चालत
येतां सूर्य समीप धांवत मिठी त्या वारुणी घालि ती
गालीं लाल तिच्या विलास करि तो प्रेमा वदावा किती ?
सूर्यौष्ठा[8] भिडतांच उत्कट तिचा तो बिंबबिंदूत्तम
झाला दीन दिनेश, मूढ पडला, व्यापी निशेचें तम !

### वृत्त–शिखरिणी.

निशा येतां सारे कर[9] विकल होऊन गळले
मुखाला काळोखी सहज चढली एकचि पळें

---

१ जगज्जेता. २ पश्चिम दिशा. ३ वेश्या. ४ दारू. ५ आपल्यावर खूष झालेली. ६ गळां मिठी मारण्याला उत्सुक. ७ मनाला रमविणारें. ८ तोंडल्याप्रमाणें लालेलाल असणारा दारूचा थेंब. ह्मणजे पश्चिमेला येऊन पोंचतांच सूर्य अस्त पावतो. निशा येते ह्मणजे रात्र होते. ९ दारू पितांच हात पाय गळतात. सूर्य पक्षीं कर ह्मणजे किरण नाहींसे होतात व काळोख पडतो.

दिवा जावा वातें अवचित तसा सूर्य लपला
कशाचा तेजस्वी अबलमदिरा ज्या करि खुळा !

---

वृत्तः—शार्दूल विक्रीडित.

" नाशा जातचि वारुणी–वशपणें[1] चंडांशुही[2] प्रत्यहीं
हें पाहूनहि टाकिती जन कसे ना वारुणी निंद्य ही !"
मी आश्चर्य मनीं करीत असतां संवाद कानीं पडे
आईला लडिवाळ बाळ पुसतो कोणी वदे बोबडे !
" आई कां ! ललतीश ? " " बाळ ! तुज रे मी काय सांगू कशी ? "
" बाबा कां तुज लोज मालिति. " " हवी ही कां तुला चौकशी ? "
" हे अंगावल धोव्हले वळ तुझ्या आले कश्यानें बये ? "
" छे छे: बाळ उगीच कांहिं असलें बोलू कधीं ही नये ? "
" आधीं थांग कसा तुदा पदल गे हा थिंब धाला असा ? "
" पाणी आणित मी मघांच, नव्हतें कां पाहिलें राजसा ? "
" हे गालावल थेंब कां ? " " डुचमळे पाणी तदा तें न कां ? "
' डोऴे लाल कशे ? ' ' चुलीजवळ मी आहें न कां बालका ' ?
" मी सुद्धा बतलों इथेच "—" न तुला पीडा करी धूर हा "
" तें कां ? " " कारण चूल त्यास पहिल्यापासून सांगे तसें
ना ऐकी पण तो तुझ्यापरि धरी वेडा पुन्हां आग्रहा
झाली थंड रुसून चूल[3] ! चिमण्या मींहीं करूं कां तसें ? "

---

१ दारूच्या नादें. २ सूर्य ह्मणजे प्रखरांतला प्रखर असून ही नाश पावतो इतका नाश सादृश्याचा देखील परिणाम आहे, हा भाव ! ३ दारू पिणाऱ्याच्या घरची चूल नेहमींच थंड पडते, ह्या गोष्टीचा फायदा घेऊन आईनें मुलाचें तोंड तेवढ्यापुरतें बंद केलें.

हा कोटिक्रम ऐकतांच थिजली ती प्रश्नमाला तदा
त्या बाळें भय घेतलेंच न घडो कीं थंड माता कदा!
कार्या कारण शोभतें न अथवा बाळा कितीसें कळें?
मातेचा शिशुवंचनें न चुकला डोळा स्वभावें गळे!
तीं आलीं टिपलीं तशीच सतिनें वेगें टिपें पोलवें
कामा लागलि आपल्या तरि तिचे तें चित्त हो कालवे!
ती जोडी कर भक्तिनें विनविण्या "देवा कृपा ही कर
या बाळा तरि दे सुबुद्धि न घडो हा बापसा पामर!"

× × ×

'बाळाचें तुज तोंड बंद करितां आलें कसेंही तरी
काळाचें करवेल काय? तुमच्या दुष्काळ माते घरीं!
बाळा भागविण्या उपाय सुचवी ही चूल जी थंडशी
मध्यान्हीं निज साक्ष कौल पटवू येतां–करी कां तशी?'
प्रश्ना यापरि मी तिला निजमनीं योजून टाकूं निघें
दारीं पाउल ठेविलें नच पुरें तों त्या स्थलीं मी बघें
झोकें खात घडोघडी अडखळे जो बोलतां चालतां
आला ओकत खांकरीत नवरा झाला तिला बोलतां!
"दे पैसे चल दे अगोदर"—"नसे हातांत पै देखिल"
"जा कोठूनहि आण, माग उसने"—"आतां कसे देतिल?"
"टाकीं कांहिं गहाण"—"एक फुटकें भांडेंहि आतां नुरे!"
"चोरी जा कर, वा कसेंहि कर जा, पैसे मला दे त्वरें!"
"चोरी हाय! कशी करूं?" "शिर कशीही कोणत्याही घरीं!"
"देवा हें भलतेंच काय वदतां?" "रांडे न तोंडें करीं!"

१ मुलाची फसवणूक. २ पदरानें. ३ अंतकालापेक्षां मध्यान्हकाल फारच कठीण असतो हें कोणास पटलेलें नाहीं?

" कोठें लौकिक, आपलें कुळ कुठें? " " हो हो! कळे तें मला ! "
" अब्रूला "–" जड भ्याड भीति नच मी गे भीक घाली तिला ! "
" आह्मांला ह्मणतील काय जन हो "–" मातींत गेले जन ! "
" मूर्खे, मी नवरा तुझा ! "–" प्रियकरा देवा तुला वंदन ! "
" माझा शद्ब तुला न मान्य कुलटे ! "–"हा! हा! न कोपा करा? "
" लोकांची धरतेस भीड "–" तर कां आतां उपेक्षा करा? "

\+ + +

" माझा मित्र उदार रोज मजला आकंठ पाजी सुधा
जीवाचा कलिजा कलाल! दुनिया ज्याशीं सदाही फिदा!
गोपांना प्रिय नंदबाळ मधुपा आह्मां तसा तो भला
दारीं याचकसा उभा, मज पुसेः–' द्या द्रव्य आधीं, चला! '
त्याला विन्मुख मी कसा दवडणें? शोभेलें कां तें मला?
दे पैसे मम सत्व राख–अथवा मारीन आतां तुला
नन्नाचा न अजून बंद तव कां पाढा तरी या क्षणीं
ही घे लाथ उरीं, तुझा हरि तुझ्या बोलाव गे रक्षणीं!

\+ + +

तो लाथेवर लाथ दे तिज, शिवी मागून ताजी शिवी
वाह्यांगीं सतिच्या क्षणोक्षण तशीं चित्तीं क्षतें हो नवीं!
सद्वक्षःस्थल पद्मकोमल तिचें भंगून जातां पुरें
" मेले जी! " सहसैव तन्मुख अशीं काढीतसे अक्षरें!

\+ + +

---

१ ' करावी '–या अर्थी बोलतांना हें रूप वापरतात! २ श्रीकृष्ण ३ दारू पिणारांना. ४ लौकिक कुलशीलाविषयीं आस्था बाळगा ह्मणून विनवण्या करणाऱ्या बायकोस धिक्कारून वर कलाला घरीं आपली नापत न व्हावी ही वृत्ति दारूबाजावांचून कोणास शोभणार? ५ हृदय. ६ कमलाप्रमाणें कोवळें.

व्हावी थंड चुलीपरी न जननी आणून चित्तीं असें
खेळूं खेळगडी निघे जमविण्या बाहेर लीलारसें
तत्कर्णीं सहसा पडे करुण तो अत्यार्त मातृस्वर
आला धांवत बाळ आंत, जनका जोडून बोले कर !
" बाबा मालु नका गलीब कतली आई किती तांगली "
" ये दावीन तुझा चिरीनचि गळा, रे कारट्या ! या पळीं " !
" थांवा हो, गलतें बगा तलि किती हें लक्त तोंदातलें
डोले हे उघले तली न बुबुलें हीं हालतीं कां बलें ? "
+ + +
ती झाडी जरि हातपाय, पडल्या नाड्या ढिल्या त्या जरी
तो घावावर घाव घालि पळही हातास ना आवरी
जागोजाग फुटून देह धरणी रक्तें तिच्या माखली
दीना वाग्विषबाणमूर्च्छित सती ती कोसळे भूतलीं !
माता कोसळतां बघून सहसा तो बाळ घाली उडी
पाहे सावरण्या तिला पण शके ना वामनी बापुडी—
त्याची मूर्ति ! परंतु कौतुक मला तें होय हो केवढें ?
शुद्ध प्रेम खरेंच अंध, न कधीं पाही जितें वा मढें
ते बाहू चिमणेच तेहि पण त्या धांवून बाळें त्वरें
आईला कवळावया पसरले अत्यंत भावातुरें !
कारुण्याढ्य अतीव दृश्य असलें पाहूनही न द्रवे
तो मद्यांध गणी जिवंतचि तिला, वाग्बाण योजी नवे !
" ढोंगी तूं नटवी अशीच पुरती आहे मला माहित
मी भ्यावें तुज नित्य हेंच कुलटे ! आहे तुझें इंगित !

१ गिडी खुजी. २ कळवळून जाऊन. ३ पाझर फोडणारें. ४ देखावा. ५ दारू पिऊन अंधळा जसा. ६ शिव्या.

भ्यालों आजवरी अजाण जनसा मी, मात्र आतां न भी
ही हाणून उरांत लाथ करितों आतां तुला गे उभी !

लाथे बरोबर तिचा तिज जीव टाकी:-
बाहेर जीभ पडली जणु पाहण्या कीं
हा मारिता सतिस तत्पति वा कृतांत[1]
ही मानवाकृति धरून फिरे जगांत !

सोहाळे पुढचे घडून सगळे त्याचे, खुनी माणसा-
साजे जें स्थल तेंच त्यास गवसे, तो होय तेगें पिसा !
आतां मुक्त फिरे जगांत; पुसतां कोणी कुणा कौतुकें
" दारूचा इतिहास "-लोक वदती " त्याला पुसा जा निकें ! "
चिंध्यापीर खुशाल आसन सदा मांडून भिक्षेकरी
हा रस्त्यावर कोपऱ्यास बसला राहून लोकां करी-
प्रेमानें उपदेश:-" ना सुजन हो ! दारू दुकानीं शिरा
ऐका हो, अविचार केविं करितां ? आधीं फिरा, जा घरा !
मित्रानो, समजा न केवळ जशीं वांगीं पुराणांतलीं
हीं माझीं वचनें खऱ्या अनुभवें मी सांगतों आपलीं !
हीं आधीं रुचतील ना, तरि पुढें येतील हो प्रत्यया
त्यासाठीं तरि लक्ष द्या मज मिळो ही भीक, येवो दया. "

[ वृत्त:-शिखरिणी ]

सखी माझी दारू अतिशय तिचा मी प्रिय सखा
कसा कोणी केला स्मरत न मला तो जन निका !
सख्यानें त्या माझ्या मम खचित नेली मनुजता[2]
कळेना ही सद्य:स्थिति अमरता[3] वा असुरता[4] !

---

१ यम. २ माणुसकी. ३ देवपण. ४ राक्षसपणा.

मला मद्यस्पर्शें सुख, सुतमुख-स्पर्श न रुचे;
सुरावासें[1] नाकीं मज सुख, न नाकीं[2] वसतिचें !
सुरापानालापें[3] श्रुतिसुख[4], सुरालाप[5] कटु ते
सुराऽभावें[6] व्हावें मज जग सुनें नीरसचि[7] तें !
सुरानामैक्यें[8] मी निशिदिन उराशीं धरि सुरा
मनीं ये कोणाचाहि तरि करि मी तत्क्षण चुरा !
खरें खोटें किंवा स्वपर[9] कसलें ना मज कळे
मुखें ये तें बोलें सहज उचली जे करिं मिळे !
न शंका सोन्यांची[10] विपुल मम लंकाचि सदन
सपंकीं[11] ती गर्ता घडलि मज रंका अनुदिन !
तदंकांच्या[12] भेकीं[13] मज कुलकलंका यम कदा
अलंकारा[14]-पाशा चढविल गळां फार सुखदा !
यमाधीना झाली तरुण गुणशाली मम सखी
सुपुत्राला आली स्थिति कटु अकालींच परकी !
मुखीं त्याच्या घालूं म्हणिन जरि कोंडा कणभर
तरी होणें नाहीं व्यसनहत मी धिक् महिभरें[15] !
अशी दारूपायीं—मम गृहरमा व्यर्थचि मरे !
अहो दारूपायीं—घर घर उपाशी सुत फिरे !

---

१ दारुची घाण. २ स्वर्गी. ३ दारू पिऊन होणारी बडबड. ४ कानाला सुख वाटणें. ५ देवगंधर्वाचें गाणें. ६ दारुचा अभाव ७ दारू हाच काय तो रस यांवाचून सर्व रसहीन ८ सुरा शस्त्रविशेष, सुरी. ९ आपलें परकें. १० पूर्ण वैभवाची. ११ चिखलांनीं भरलेली गार. १२ कांठींचा. १३ बेडूक. १४ मरण्याला तयार झालेल्यास यमपाश आणि दागिनें सारखेच. १५ भुईला भार.

अहो दारूपायीं–मम कुल तशी कीर्ति बुडली !
अहो दारूपायीं–मज अवदशा कोण सुचली ?

---

वृत्तः—वसंततिलक.

साष्टांग वंदन सुरे ! तुज पूर्ण भावें
कोणी कधीं तुजपुढें कुशले निभावें ?
या भारतास तव संग नकोच आई !
जेथून आलिस तिथें परतून जाई !

---

## ५०. गेले चित्तरंजन दास !

**पद–चालः**—नाचत ना गगनांत०

चित्तरंजन दास । गेले । सहसा कां स्वर्गास ? ॥ ध्रु० ॥
" भारतजननी चहुबाजूंनीं सोसी सासुरवास । निशिदिनी । सो०
तिची सोडवण व्हावी झटकन "–हें मागूं देवास ॥ गेले ॥ १ ॥
" स्वार्थ-मगरमिठी पडून कंठीं बेकीची पैदास । मुबलक । बेकी०
माते स्वजनीं तिज वधणें आणि "–हें मागूं देवास ॥ गेले ॥ २ ॥
" कामीं न पडे बोलघेवडे तुंबळ हा माणूस । जमलें । तुंबळ०
वाणी करणी समहो स्वजनीं "–हें मागूं देवास ॥ गेले० ॥ ३ ॥
"गोरा मालक काळा सेवक कायम हा इतिहास । न व्हावा० ॥ कायम०
भारतवर्षीं स्वदया वर्षीं;–" हें मागूं देवास ॥ गेले० ॥ ४ ॥

---

## ५१. प्रभुप्रार्थना.

पद.

राग यमन. ( चाल—लागे हृदयिं हुरहुर. )

घे हा पदरिं नत जन । प्रभु । तुज विनति करुणघन
ही निशिदिन! ॥ ध्रु० ॥

तुज न गुणाची चाड निर्गुणा, सत्य नसे मजजवळ, न
गुण कण! ॥ १ ॥

शस्त्रहि हातीं धरिसि उदारा, मजवर कठिण न कर तूं
निज मन ॥ २ ॥

हत पतितांचा तूंच आसरा, शरण कुणा मी
जावें तुजविण? ॥ ३ ॥

REFBK-0003166

समाप्त.

ग्रंथालय ठाणे
ग्रा. क्र. ३७९९

# शुद्धिपत्रक.

| पान | ओळ | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | ११ | भरुनी | भरला |
| ४ | १८ | बघणार | बघणार |
| ६ | १० | विकार कुविचार | विकारकुविचार |
| ८ | ११ | नेहमिंच | नेहमींच |
| ९ | ८ | पर | पद |
| ,, | १३ | उपाय | उपाया |
| ,, | ,, | गिरवावा | गिरावा |
| १० | १० | मुग्धें | मुग्धे ! |
| ११ | ९ | रुजतें | रुजलें |
| ,, | २० | निर्की | निकी |
| १३ | १५ | पुडारी | पुढारी |
| ,, | २१ | | ऐपत नसतांहि मुळीं होणें आजि भाग सत्य मज राणा ! |
| १५ | १ | तो | तों |
| ,, | ४ | सुकुनि | सुकतिं |
| ,, | ,, | लोवनें | लोचनीं |
| १६ | ४ | व्योगीं | व्योमीं |
| ,, | १६ | | चालः—या नव नवल नयनों० |
| १८ | १७ | बापाची लेक | बापाची ती लेक ! |
| २२ | १७ | माहि | मींही |
| २५ | २१ | | वृत्तः—वियोगिनी. |
| २७ | १४ | पर तेजानें द्रिधल्या | परतेजानें दिपल्या ! |
| २८ | ६ | नांव | नाव |
| ,, | १० | जगु | जणुं |
| २९ | ८ | जे आजि | उदंड जे आजि |

| पान | ओळ | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३७ | १४ | उताविळ होत | उताविळ हात |
| ४४ | ९ | कलत्या | भलत्या |
| ,, | १५ | शुद्धपक्ष | शुद्धपक्ष |
| ४९ | मथाळा | प्रियस्मारक | प्रियास्मारक |
| ,, | २ | ,, | ,, |
| ,, | ९ | येथे | येते |
| ५० | ३ | कृतार्थ | हृतार्थ ! |
| ,, | १६ | परतून पहा जननी कशी<br>मजवांचून हताश होय ती | परतून पहा घडे कशी।<br>मजवांचून हताश माय ती ! |
| ५५ | १२ | सख्या | सखा |
| ५६ | १७ | सामर्थ्थ | सामर्थ्य |
| ५७ | २ | तक | एक |
| ,, | ६ | मुंवई | भुंवई |
| ५८ | ६ | नाही | वाही |
| ५९ | १० | माथां वीजचि फोडि तों | माथां वीज पडेचि तों ! |
| ६४ | ११ | लोर्ली | लोकीं |
| ,, | १२ | सेवा हो | सेवा हा |
| ,, | १३ | भाषान्वित | भावान्वित |
| ६६ | १९ | जिनें | जिवें |
| ६७ | १ | न | ना |
| ,, | २ | कर स्पर्श | करस्पर्शसुखलाभ |
| ७० | १४ | शेत | शीत—तोय |
| ७१ | २३ | करण्यान | करण्यास |
| ७६ | १ | द्विज राजशेखर | द्विजराजशेखर |

## खालीं लिहिलेलीं पुस्तकें आमचेकडे विकत मिळतील.

| | | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| १ | हिंदी–शिक्षक, पुंडलीकजीकृत .... | १ | ८ | ० |
| २ | पावनि पद्यमाला ... ... | ० | १ | ० |
| ३ | अंबानंदन मेळयाची प्रथम गीतावली .... | ० | १ | ६ |
| ४ | ,, ,, द्वितीय गीतावली .... | ० | २ | ६ |
| ५ | वीररसायन अर्थात् सिंहगडचा पोवाडा .... | ० | २ | ० |
| ६ | प्रार्थना पुष्पांजली ... .... | ० | ० | ३ |
| ७ | साहित्य नूपुर .... ... | १ | ० | ० |

८ वीरश्री शृंगार अर्थात् बाजीप्रभूंचा पोवाडा .... छापत आहे.

९ श्रीप्रतापमार्तंड अर्थात् अफझुलखानाच्या वधावरील पोवाडा.... छापत आहे.

पुस्तकें, अगाऊ किंमत घेऊन किंवा व्ही. पी. नें पाठविलीं जातील. टपाल खर्च निराळा पडेल.

चिटणीस,

**श्री अंबाबाई तालीम संस्था, मिरज.**

